म. ग्रं. सं. ठाणें.
विषय .निबंध.....
सं. क्र. १५५८

बुक ट्रस्टचा ग्रंथ

# कल्की

अर्थात्

## संस्कृतीचे भवितव्य

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्

REFBK-0010894

पब्लिकेशन्स डिव्हिजन

नॅशनल बुक ट्रस्टचा ग्रंथ

# कल्की

अर्थात्

## संस्कृतीचें भवितव्य

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्

अनुवाद : प्रभाकर माचवे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत

REFBK-0010894

पब्लिकेशन्स डिव्हिजन,
माहिती व नभोवाणी मंत्रालय
भारत सरकार, दिल्ली ८

पौष, १८८१ ( Pausa, 1881 )
जानेवारी, १९६० ( January, 1960 )
मूळ इंग्रजी प्रथमावृत्तीचें प्रकाशन वर्ष : जुलै, १९४८

**किंमत : ७५ न. पै.**
Price : 75 nP.

KALKI;
OR, THE FUTURE OF CIVILIZATION
( *Marathi* )

© नॅशनल बुक ट्रस्ट, ( इंडिया ) १९६०

प्रकाशक : डायरेक्टर, पब्लिकेशन्स डिव्हिजन, ओल्ड सेक्रेटॅरिअेट, दिल्ली ८.
मुद्रक : मा. ह. पटवर्धन, संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 30020 वि: निबंध
क्रमांक 9554 नों दि: ६/५/६५

# अनुक्रमणिका

| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| प्रस्तावना | ... २ |
| विपरीत परिणाम – धर्म | ... ६ |
| समस्या | ... १८ |
| पुनर्रचना | ... २८ |

अनुक्रम 36620 दि: 16 बांदे ... ग्रंथ ... शाखा
कमांक 9548 नोंद दि ... दा. क्र. 9068

## प्रस्तावना

मानवी सभ्यतेच्या विकासमार्गांत कालक्रमानुसार जे पेचप्रसंग निर्माण होतात त्यांपैकी एकातून ती सध्या जात आहे, असे दिसत आहे. जग आपली जीर्ण आवरणे बदलीत आहे. जे मानदंड, ध्येये आणि संस्था एका पिढीपूर्वीच साधारण-पणे सर्वमान्य होत्या त्याना विरोध होत आहे, त्या बदलत आहेत. जुने हेतू आता दुबळे पडत आहेत आणि नवीन शक्ति उसळत आहेत. या युगाच्या मनोरचनेचे ज्यांना आंतरिक दर्शन घडले आहे, त्यांना या युगातील अस्वस्थता व अनिश्चितता, आर्थिक आणि सामाजिक सद्यःस्थितीबद्दल असंतोष, अजून साकार न झालेल्या नव्या समाजव्यवस्थेसाठी या युगाची तळमळ, यांची स्पष्ट जाणीव आहे. या सर्व वैचारिक गोंधळाचा आणि अव्याकृत आदर्शाबद्दलच्या अस्थिर उत्साहाचा अर्थ एवढाच की मानवजात एक पाऊल नव्या दिशेने पुढे टाकीत आहे.

या अव्यवस्थिततेत एक महत्त्वाचा घटक म्हणजे आधुनिक विज्ञान. विज्ञान आपल्या आजच्या संस्कृतीचे कांही विशेष लक्षण आहे असे नाही. पण अलीकडे विज्ञानाच्या प्रगतीचा वेग इतका जलद आणि त्याची झेप इतकी व्यापक व सखोल झाली आहे की आपल्याला त्याचे चटकन अनुसरण करता येत नाही. एखाद्या प्राण्याला आपण त्याच्या नेहमीच्या वातावरणातून काढून वेगळ्या वातावरणात ढकलले, तर त्या नव्या वातावरणाशी समरस होईपर्यंत त्याला अस्वस्थ वाटणे साहजिकच आहे. रिपनच्या बिशपने जेव्हा काही काळ विज्ञानाला सुट्टी द्यावी असे सुचविले तेव्हा त्याने आम्हाला सावध केले की विज्ञान ज्या वेगाने पुढे जात आहे व नवनवीन शोध आमच्या हाती देत आहे त्या वेगाने त्या सर्वांचा उपयोग करणारा मनुष्य मात्र पुढे जात नाही.

बाह्यतः जग एकसारखे होत आहे. युरोप आणि अमेरिका तसेच आशिया आणि आफ्रिकाहि त्याच दिशेने वाटचाल करीत आहेत. पहिले दोन खंड जास्त जलद जात आहेत. मोटारगाड्या, विमाने, बोलपट ही आधुनिकीकरणाची प्रत्यक्ष प्रतीके अगदी मागासलेल्या देशातूनहि दिसून येत आहेत. चीनपासून मेक्सिको-पर्यंत निसर्गाच्या शक्तीवर नियंत्रण आणि निसर्गाच्या दौलतीवर अधिकार या बाबतीत मनुष्याच्या निरंतर वाढत्या व्याप्तीवरच प्रगति अवलंबून आहे, असा विश्वास बळावत चालला आहे.

---

अनुच्चारित अनुस्वार अजीबात गाळले आहेत.

हिंदुस्थान आणि चीन या भोवऱ्यात ओढले जात आहेत. पूर्वेकडील ही अशांति या नव्या जाणिवेमुळे आहे की जर पौर्वात्य राष्ट्रांचा ऱ्हास आणि मृत्यु टाळायचा असेल तर त्यांनी देखील इतर राष्ट्रांच्या बरोबरीने उभे राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्या इतर राष्ट्रांच्या साहसप्रियता आणि संघटनाशक्तीमुळे त्यांची झेप जगाच्या अगदी लांबच्या कोपऱ्यापर्यंत पोचू शकली आहे. काही भयभीत लोक आम्हाला भेडसावू पाहतात तितकी पूर्व आणि पश्चिम एकमेकीपासून दुभंगलेली नाही. निरनिराळ्या संस्कृतीच्या लोकांना एकत्र आणणारे आणि त्यांचे परस्पर संबंध निगडित करणारे किती तरी घटक आहेत. आध्यात्मिक आणि बौद्धिक सृष्टि, विज्ञान, स्थापत्यशास्त्रांतील तंत्रे, शासनपद्धति, कायदेकानू, प्रशासन-व्यवस्था, आणि आर्थिक संस्था इत्यादि बाबतींत आज संपूर्ण जग एका जिवंत देहाप्रमाणे वागत आहे.

ही बाह्य एकरूपता आली, पण त्यामुळे मनाची व आत्म्याची आंतरिक एकता निर्माण झाली नाही. या नवीन जवळीकीत आम्ही गुंतलो, पण, त्यामुळे सुख वाढले नाही की संघर्ष कमी झाले नाहीत; कारण या मीलनासाठी आम्ही मानसिक किंवा आत्मिक दृष्टया तयार नव्हतो. मॅक्सिम् गॉर्कीने एक दृष्टान्त दिला आहे. किसानांच्या श्रोतृवृंदासमोर विज्ञान ह्या विषयावर बोलल्यानंतर व तांत्रिक संशोधनाचे चमत्कार सांगितल्यानंतर, एका किसान म्होरक्याने त्याला खालील शब्दांनी हटकले, "हो, आम्हाला पक्ष्यांप्रमाणे हवेत उडायला शिकवले, मासळ्या-प्रमाणे पाण्यात पोहायला शिकवले, पण या पृथ्वीवर कसे जगावे हे आम्हाला ठाऊक नाही." या लहानशा पृथ्वीवर ज्या जमाती, जे धर्म, जी राष्ट्रे एकत्र नांदत आहेत, त्यांच्यात सद्वृत्त जीवनाला आवश्यक अशा मैत्रीची भावना नाही. उलटपक्षी ते एकमेकाना परस्परविरोधी शक्ति मानतात. मानवजातीने बाहेरून परस्परसदृश शरीर धारण केले असले तरी त्या शरीरात एकच प्राणशक्ति दिसून येत नाही. जगाचे मन अजून एक झालेले नाही.

स्पेंग्लरने आपल्या 'दि डिक्लाइन ऑफ दि वेस्ट' (पश्चिमेचा ऱ्हास) या ग्रंथात असा सिद्धान्त मांडला आहे की निरनिराळ्या राष्ट्रांच्या निरनिराळ्या संस्कृति असतात, आणि त्या निरनिराळे आदर्श व्यक्त करतात. हा सिद्धान्त मान्य केला तर जगाची एक सर्वसामान्य सभ्यता किंवा संस्कृति कधी विकसित होईल ही आशाच बाळगायला नको. स्पेंग्लरचे हे गृहीत कृत्य कितीहि आकर्षक असले तरी ते तथ्यावर आधारलेले नाही. त्याच्या मतें जाति आणि सभ्यता हे असे घटक आहेत की ज्यांच्या ठायी उत्पत्ति, विकास आणि ऱ्हास असा नियमित लयबद्ध चक्रनेमिक्रम सारखा चालू असतो. प्राचीन काळीं कदाचित् प्रादेशिक संस्कृति एकीमागून एक आल्या असतील किंवा बाल्य, तारुण्य, प्रौढत्व, वार्धक्य अशा अवस्थांतून गेल्या असतील आणि

त्यांचा नाश होताना त्यांनी आपला वारसा नव्या बालसंस्कृतींना दिला असेल. या बाबतीत आता मात्र अशी काही शक्यता उरली नाही. परिमित प्रदेशापुरत्या प्रादेशिक संस्कृतींचा काळहि आता संपुष्टात येत चालला आहे. आता निश्चितपणे असे म्हणता येणार नाही की मानवजातीचा इतिहास म्हणजे एक निरंतर गति आहे आणि तिचे निरनिराळ्या परिस्थितीमुळे आणि देशज गुणांमुळे वेगवेगळ्या प्रवाहात नंतर विभाजन झाले. सुसिद्ध वस्तुस्थितीवरून असे दिसून येते की निरनिराळ्या संस्कृति बराच काळ आपापल्या पद्धतीने विकसित होत गेल्या; नंतर त्या परस्पराकडे आकर्षिल्या गेल्या आणि आता त्यांना एक प्रचंड एकरूपत्व येत आहे. स्पेंग्लर म्हणतो की पाश्चात्य संस्कृति काही कठोर नियतीच्या आदेशानुसार म्हातारी झाली आहे व त्या नियतिविरुद्ध बंड करणे व्यर्थ आहे. त्याच्या या म्हणण्यातले सत्य फार व्यापक स्वरूपाचे आहे. ते असे की सर्वच प्रादेशिक संस्कृति आता गळत चालल्या आहेत आणि जागतिक प्रमाणावर आम्ही जीवनकलेत एक नवा प्रयोग सुरू करणार आहोत. कोणतीहि एकटी ऐतिहासिक सभ्यता किंवा संस्कृति आपण विश्वात्मक असल्याचा दावा करू शकत नाही ; कारण त्यापैकी प्रत्येक संस्कृति काही व्यक्तिसमूहाच्या जीवनशक्तीचा आविष्कार होय. या बाबतीत इतिहासाव्यतिरिक्त दुसरा युक्तिवाद नाही, आणि इतिहासाला कोणी अमूर्त विश्वात्मक असा मानव ठाऊक नाही; आणि म्हणून विश्वात्मक संस्कृति होऊ शकणार नाही. भावी संस्कृतीला मानव आणि मानवी जीवन यांच्या विश्वात्मकतेचे स्वप्न साकार करण्याइतपत उंच जावे लागेल. मानवजातीच्या खऱ्या हिताकडे पूर्वीच्या आणि आजच्या प्रादेशिक संस्कृतींनी लक्ष दिलेले नाही. त्यांनी जातिगत, धार्मिक व राजकीय एकसत्तेचे पोषण केले. पुरुषांच्या स्त्रियावर व धनिकांच्या गरिबावरील वर्चस्वाची तरफदारी केली. सर्व मानवजातीसाठी एक स्थायी संस्कृति निर्माण करण्यापूर्वी, प्रत्येक ऐतिहासिक संस्कृतीला स्वतःच्या मर्यादांची जाणीव होणे जरूर आहे. प्रत्येक ऐतिहासिक संस्कृतीला हे कळले पाहिजे की सर्व जगाची आदर्श संस्कृति होण्यास ती नालायक आहे.

भावी संस्कृतीचा सामान्य आधार यांत्रिक शोधांच्या विजयामुळे बनत आहे, तर रूढ विचारपद्धति, समजुती आणि आचारांचा क्रमभंग आध्यात्मिक एकतेला आवश्यक भूमिका तयार करीत आहे. अशा प्रकारचे परिवर्तन सर्व मानवसमाजामध्ये घडून येत आहे. विशेषत्वेकरून तरुण पिढीच्या मनात ते झपाट्याने घडत आहे. कारण आजची तरुण पिढी आता दुसऱ्यांच्या हाती ओली माती म्हणून राहू इच्छीत नाही, मग ते दुसरे कितीहि म्हातारे किंवा शहाणे असोत. चैतन्य हेलावले आहे, आजपर्यंत जे विचार आणि ज्या कल्पना आम्ही उराशी बाळगल्या त्या अपुऱ्या आणि असंतोषजनक आहेत असे दिसून येत आहे, आणि नव्या मूल्यां-

साठी आम्ही चाचपडत आहोत. वातावरणात विलय दिसत आहे. जुने श्रद्धाविषय ढासळत आहेत. प्रत्येक धर्माच्या आणि देशाच्या विचारवंत पुरुषांमध्ये आध्यात्मिक पर्युत्सुकतेची आणि प्रतीक्षेची भावना दिसून येत आहे.

ज्यांच्याबरोबर कोणताहि वादविवाद शक्य नाही असे काही अतिवादी लोक सोडले तर आज प्रत्येक ऐतिहासिक संस्कृतीच्या पुढाऱ्याचा ठाम समज आहे की सबंध मानवजात, तिचे व्यापकत्व व ऐतिह्य विचारात घेता, एक जिवंत घटक आहे. हा घटक श्रद्धापूर्वक व ऐटीत वाढत आहे. आणि याची प्रगति अमर्याद आहे. डांटेने म्हटले होते, "या संस्कृतीचे एक विशिष्ट ध्येय नी त्या संस्कृतीचे दुसरे विशिष्ट ध्येय असे असू शकत नाही. साऱ्या मानवजातीच्या संस्कृतीचे एकच ध्येय आहे." सबंध मानवसंस्कृतीचे एकच ध्येय आहे. याचा अर्थ असा नव्हे की सर्व लोक एकच भाषा बोलतील किंवा सर्वांचा एकच धर्म असेल, किंवा सर्व एकाच राज्यशासनाखाली राहतील, किंवा सर्वांच्या चालीरीतींची एक अपरिवर्तनीय पद्धति असेल. संस्कृतीचे ऐक्य एकरूपतेत नाही, तर समन्वयात आहे. प्रत्येक महान् संस्कृति निरनिराळ्या आदर्शांच्या व स्वभावांच्या लोकांच्या संगमाने तयार झाली आहे. इजिप्त व बाबिलोन, भारत, चीन, ग्रीस आणि रोम हे सर्व हेच सत्य सिद्ध करतात. आज सांस्कृतिक समन्वय करणाऱ्यांचे क्षेत्र व्यापक होत आहे आणि त्यात संपूर्ण जगाचा समावेश होत आहे. भावी धर्म सहकारितेचा आहे, एकरूपतेचा नाही; सह-काऱ्याशी संगनमत करण्यात आहे, तिचे अनुकरण करण्यात नव्हे; सहिष्णुतेत आहे, अरेरावीत नव्हे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः ........................
क्रमांक ........................ नोंद दिः ........................

# २. विपरीत परिणाम

## धर्म

धर्माच्या बाबतीत पूर्वेकडील स्थिति पश्चिमेपेक्षा कमी फसवी नाही. प्रत्येक ऐतिहासिक धर्मातील ईश्वरवादाचा सनातनी पाया पोखरण्याचे काम मानसशास्त्र आणि समाजशास्त्र, प्राणिशास्त्र आणि मानववंशशास्त्र यांनी चालविले आहे. धार्मिक अनुभवाची निरनिराळी वर्णने ही देव म्हणजे मानवी मनाची एक छाया होय, मानवी अंतःकरणाचे एक स्वप्न होय, या ईश्वराविषयीच्या नवीन टूमबाज दृष्टिकोनाचा पाठपुरावा करताना दिसताहेत. धार्मिक क्षेत्रातील जे प्रज्ञावंत लोक परलोकाची भाषा बोलतात ते मानसिक चिकित्सालयात तपासणी-करता पाठवायला योग्य आहेत असे वाटू लागले आहे. जुना युक्तिवाद आधुनिक मनाला पटत नाही. प्रत्येक वस्तूला जर कर्ता आहे, तर ईश्वरालाहि कर्ता असायला हवा. आणि ईश्वर जर कर्त्याविना अस्तित्वात येऊ शकतो, तर मग जगहि कर्त्याविना असू शकते. हे असले अपूर्ण जग एखाद्या कुशल आणि समर्थ अशा परमेश्वराची सृष्टि असूच शकत नाही. परमात्म-तत्त्वाला इतिहासात प्रमाण मिळत नाही. म. लॉइसी म्हणतो, "इतिहासकार इतिहासातून परमेश्वराला काढून टाकीत नाही. त्याला कधी इतिहासात ईश्वर भेटतच नाही. जेथे सर्व प्रमादांचा परिहार होईल आणि सर्व अश्रू पुसले जातील अशा अधिक न्यायपूर्ण जगासाठी आम्हाला जी तळमळ लागली आहे ती हेच दर्शविते की हे जग उपजतच अन्यायपूर्ण आहे. देव इथे आहे किंवा तिथे आहे, असे ठाम म्हणता येण्याजोगे परमेश्वराच्या अस्तित्वाचे कोणतेच प्रत्यक्ष प्रमाण दिसत नाही. माणूस ईश्वराच्या अस्तित्वाची खूण मागत असताना ईश्वर गप्प आहे हे नास्तिकवादाचे सर्वात मोठे प्रमाण आहे. असे असतानाहि काही लोक आस्तिकतेला चिकटलेले आहेत, याबद्दल आश्चर्यापेक्षा दुःखच व्हायला हवे. त्यांची श्रद्धा बुडत्याला आधाराच्या काडीइतकी दुबळी असते; मग हितसंबंधी ईश्वरवादी काहीहि म्हणोत.

ईश्वर पापाचा बदला घेतो किंवा आपल्या शत्रूशी संगनमत करून मानव-जातीला अनंत अकल्पनीय यातना भोगायला लावतो, किंवा परत निराळ्या मनःस्थितीत या काल्पनिक अन्यायाविरुद्ध स्वतःच कृपावंत होऊन कृत्रिम उपाय शोधून काढतो, कारण जग निर्माण करण्यापूर्वीच त्याने तशी नियति घडविली होती. अशा प्रकारच्या कोणा कोपिष्ट ईश्वराविषयीच्या गोष्टी निरनिराळे

ईश्वरवादी पंथ जेव्हा शोधून काढतात तेव्हा ते माणसाच्या भाबडेपणाचा गैरफायदा घेत असतात. या सर्व अलौकिक कथा म्हणजे जगाच्या बाल्यातील सुरस आणि चमत्कारिक परी-कथा होत. प्राचीन ग्रंथांचा आजच्या समस्या सोडविण्यास फारसा उपयोग नाही. प्राचीन शास्त्रांचा आधुनिक अपेक्षेप्रमाणे नव्याने अर्थ लावण्याचा कोणताहि प्रयत्न भूतकाळाबद्दल श्रद्धा दर्शवील पण तो बौद्धिक प्रामाणिकपणा नव्हे. धर्म बालिश मनाचा आवडता छंद होय. रोखठोक विचार करणाऱ्यांचा त्याच्याशी काही संबंध नाही. ईश्वर अस्तित्वात नाही, आणि आपण एका निष्ठुर, निर्विकार श्रद्धेच्या हातातील बाहुली आहोत. या निष्ठेला पाप-पुण्याचे काहीच वाटत नाही. आणि तिच्या बंधनातून सुटलो की आम्ही संपूर्ण अंधकाराकडे पळत जाणार.

या उलट असेहि काही म्हणतात की ईश्वराच्या अस्तित्वाचा निश्चयात्मक पुरावा नसला तरी ईश्वर नाही असेहि निश्चितपणे म्हणता येत नाही. आपण काही ठाम मानू नये किंवा अमान्यहि करू नये. जे काही लोक धर्माला अनुकूल आहेत ते ईश्वराला संशयाचा फायदा देतात, पण त्याच्या संकटकाळी मात्र ते त्याला दगा देतात. कट्टर अज्ञेयवादी म्हणतो की एका पामर मर्त्याने ईश्वर नाही असे म्हणण्याचे धाष्टर्य करू नये. कारण ईश्वर कोण आहे आणि कसा आहे हे त्याला ठाऊक नाही. नास्तिकवाद आणि आदिकारणवाद या दोन विचार-प्रणालींच्यामध्ये अज्ञेयवादी घोटाळत असतो. त्याच्या ठायी दोहोपैकी एकाचाहि उदात्त आत्मविश्वास नसतो, पण त्याला वाटत असते की हा प्रश्न त्याच्या आवाक्यापलीकडचा आहे.

काही लोक ईश्वरवादी विचारप्रणालीचे उपयोगितावादी मूल्य मानतात. मात्र अशा लोकांना ईश्वरावर श्रद्धा बाळगणाऱ्या धर्माचा किंवा अदृश्याच्या साक्षात्काराचा काही उपयोग वाटत नाही. आम्हाला आत्म्याच्या मोक्षाची इतकी चिंता नाही, पण जग सुधारण्याची आहे. सामाजिक शांततेला व हिताला धर्माचा उपयोग होतो म्हणून जगदुद्धाराच्या कामी आम्ही त्याचा उपयोग करू.

प्रत्येक धर्मातील बहुसंख्य लोक धर्मापासून मिळणारी सुखे मिळवू इच्छितात. पण त्यांना विचार करण्याचे दुःख नको असते. यामुळे ते अंधश्रद्धेच्या मार्गी लागतात. त्यांचे डोळे पुरातनाकडे लागलेले असतात, आणि त्यांच्या दृष्टीने त्यातच संपूर्ण मानवी अनुभवाचे शहाणपण साठविलेले असते. वस्तुतः जे मृत आहे तेच जगत असते, आणि तेच जिवंतावर अधिकार गाजवीत असते. आध्यात्मिक स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नात कैक लोक आत्यंतिक व्यक्तिवाद पत्करतात तर काही लोक प्रकृतिवादाला शरण जातात. काहींचे समाधान संशयवादाने व शून्यवादाने होते. अशा रीतीने वैचारिक अराजक माजते.

३६६२० वि: ७
१५५४ नों वि:

*कुटुंबजीवन*

गेल्या महायुद्धामुळे झालेले सामाजिक विघटन, वाढलेल्या वयात लग्ने घडवून आणणारी आर्थिक परिस्थिति, आत्मप्रकटीकरणाची लालसा, मातापित्यांचे सैल होत जाणारे नियंत्रण, अपुरे लैंगिक शिक्षण, फ्रॉइडचे मानसशास्त्र, आणि नैसर्गिक परिणामांची भीति दूर करणारे कुटुंबनियोजनाच्या साधनांचे ज्ञान—या सर्वांमुळे नैतिक मानदंड खिळखिळे झाले आहेत. स्त्रिया आता, पुरुषांना जे निर्बंध लागू आहेत त्याव्यतिरिक्त दुसऱ्या निर्बंधांनी स्वतःला बांधून घेऊ इच्छित नाहीत व हे बरोबरच आहे. पुरुषांच्या व स्त्रियांच्या स्वभावात किंवा मनोवृत्तीत काही मूलभूत भेद मानणारे जुने आदर्श आता निकालात निघाले आहेत. पुरुषांनी स्त्रियांना अंगिकारायला लावलेली विवाहपूर्वक अभंग कौमार्याची कल्पना आता बरीच मागे पडली आहे. आपल्याला सांगण्यात येत आहे की पुरुषांप्रमाणे स्त्रियाहि प्रमाथी वासनांच्या अनिर्बंध व्यक्ति आहेत आणि त्यांनाहि रटाळ जीवनापेक्षा अद्‌भुतरम्यता आवडते. स्त्रिया मोठ्या आवेशाने आणि यशस्वीपणे प्रतिपादीत आहेत की पुरुषांपेक्षा त्या श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसून स्थिरतेत तशा स्खलनातहि पुरुषाच्या समान पातळीवर आहेत. लैंगिक स्वैराचार ही जुनी खोड आहे. मानवजात अस्तित्वात आली तेव्हापासूनची ही खोड आहे. पण आता तिला नवे नाव देऊन आपण तिचे समर्थन करीत आहोत. हे नवे नाव म्हणजे आत्मप्रकटीकरण. दर्जेदार ललितवाङ्मयात स्वैराचाराचे समर्थन आढळते, आणि वरच्या समाजात तो मान्य केला जातो.[१] आपली सदसद्‌विवेकबुद्धि संतुष्ट राखून आपल्या वासना तृप्त करणाऱ्या गुलहौशी स्वैरिणी आर्थिक आवश्यकतेमुळे पापकर्मव्यवसाय करणाऱ्या स्त्रीला तिच्या धंद्यातून उठवीत आहेत. कित्येक स्त्रिया तर पाप करतात त्या वासनातृप्ति पुरी करण्याठी नव्हे, तर विवाहित स्त्रीला प्रियकर हवेत म्हणून. लैंगिक स्वैराचार समाजाच्या काही गोटात एक सामाजिक

१ कोलोराडोमध्ये डेनवेरच्या बाल व कौटुंबिक न्यायालयाशी सव्वीस वर्षे संबद्ध असलेल्या बेन. बी. लिंड्से या न्यायाधीशाने आपल्या 'रिव्होल्ट ऑफ मॉडर्न यूथ' (आधुनिक तरुणांचे बंड) नावाच्या खळबळजनक पुस्तकात लिहिले आहे की, "१४ ते १७ वर्षे वयातील प्रत्येक दहापैकी एक मुलगी लैंगिक गुन्हेगार आहे, आणि सतरा ते एकवीस वर्षे वयातील मुलीत हे प्रमाण आणखी जास्त आहे. जे तरुण किंवा ज्या तरुणी सामुदायिक उपाहारात किंवा मेजवान्यात किंवा नृत्यात भाग घेतात आणि मोटारीतून एकत्र फिरतात त्यापैकीं ९९ टक्के एकमेकांची आलिंगने व चुंबने घेतात, आणि त्यातील ५० टक्के चुंबनालिंगनाची मर्यादा ओलांडून पुढे जातात." लिंड्से म्हणतो, की "डेनवेर शहराबाबत जे खरे आहे ते अमेरिकेतील प्रत्येक शहराच्या व खेड्याच्या बाबतीत अधिक खरे आहे". तथापि आपण असे समजू की परिस्थिति खरोखर इतकी बिघडलेली नाही, आणि आशा बाळगू की लिंड्सेचे चित्र जरा अतिरंजित असावे.

कर्तव्य मानले जाऊ लागले आहे. सामाजिक निर्बंध पुरुषांना फायदेशीर व स्त्रियांना गैरफायदेशीर असल्यामुळे कित्येक स्त्रिया ते निर्बंध मानायलाच तयार नाहीत. कारण ते निर्बंध कितीहि सैल, पक्षपाती आणि म्हणून अन्यायकारक असले तरी त्यांचे उल्लंघन कठीण आणि धोक्याचे आहे. 'तेजस्वी तरुणीं'च्या या वाढत्या वर्गातील कित्येकींची महत्त्वाकांक्षा आर्थिक स्वातंत्र्याबरोबर लग्नाच्या बेडीतून व मातृत्वाच्या जबाबदारीतून मोकळीक मिळावी अशी असते. घटस्फोटांचे प्रमाण वाढत आहे आणि ज्यांचे एकमेकाशी संबंध फक्त वकिलामार्फत उरले आहेत अशा आई-बापांमध्ये मुलांची अवहेलना होत आहे.

या बाबतीत चार निरनिराळ्या वृत्ति दिसून येतात. आदिकारणवादी लोक जुन्या मतांचा पुरस्कार करतात व म्हणतात की प्रेमावाचून लग्न जर दुःखद असेल तर लग्नावाचून प्रेम हे पृथ्वीवर नरक होय. लग्नाशिवाय मीलन प्रेमाने उजळलेले असले तरी गुन्हाच होय. व कोणताहि विवाह, मग तो प्रेमविरहित असला तरी चालेल, नेहमीं पुण्यमयच होय.

सामाजिक आदर्शवादी आपल्याला सांगतात की बदलत्या जगासाठी स्थिर असे नीति-नियम अशक्य आहेत. आदर्शवादाच्या उंच पातळीवर फार वेळ टिकता येत नाही. व्यावहारिक पातळीवर आलो की मोठमोठी तत्त्वे आणि आचारातील शैथिल्य यांचा फार मोठा विरोध आपल्याला दिसून येतो. आमची परंपरागत विचारसरणी बऱ्याच स्त्रियांना संतोषजनक लैंगिक आयुष्य लाभू देत नाही. उदाहरणार्थ, इंग्लंडसारख्या देशात पुरुषांपेक्षा वीस लक्ष जास्त स्त्रिया आहेत. धार्मिक जीवनावरील श्रद्धा कमी होत चालली आहे, त्यामुळे स्त्रियांची वाढती संख्या धर्मपंथांतून, मठांतून वगैरेहि सामाविता येत नाही. अशा स्थितीत एकपत्नीत्वाचा आग्रह धरला तर किती तरी स्त्रियांना ब्रह्मचर्याचे खडतर जीवन जगावे लागेल. पण जबरदस्तीने लादलेले ब्रह्मचर्य हा 'वदतो व्याघात' होय. रूढ नैतिक बंधनांचे बळी लैंगिक दृष्ट्या अतृप्त राहू इच्छीत नाहीत. काहींना साहजिकच मनोविकृति जडते. कारण कोणतीहि अतृप्त वासना म्हणजे आत्मिक यातना. बऱ्याच मुलींची लग्ने होत नाहीत आणि मग लैंगिक वासनापूर्तीचे अन्य मार्ग त्या शोधतात. आणि अशा रीतीने घडणाऱ्या नीतिबाह्य वर्तनाकडे आपल्याला कानाडोळा करावा लागतो. बहुपत्नीत्व बेकायदेशीर असले तरी त्याचा सर्रास व्यवहार दिसून येतो. व्यावहारिक बहुपत्नीत्व अश्लीलता, मिथ्याचरण व रोगराई पसरवते व सर्वांचा अधःपात घडविते. मृत्यु तुम्हाला वेगळे करीपर्यंत तुम्ही एकमेकाला चिकटून राहा असे व्रत तरुणांना घ्यायला लावणे वेडगळपणाचे आहे. जोपर्यंत प्रेम हे अखंड परस्पर कर्तव्याचा करार होत नाही तोवरच ते सुरक्षित असते. या सामाजिक असंतोषाच्या समस्येचा एकमात्र उपाय म्हणजे 'प्रायोगिक लग्ने' होय.

संशयवाद्याना हे ठाऊक आहे की आता प्राचीनाकडे आपण परत जाऊ शकत नाही. पण वर्तमान स्थिति पाहता त्यांची अंतःकरणे खिन्न होतात की घटस्फोटाची कोर्टे सतत कुटुंबांना फोडीत आहेत. कुटुंबाच्या घटकांना नवे विवाहसंबंध जुळवण्यास मोकळे सोडीत आहेत. बिचाऱ्या मुलांना नवनव्या घरातून इकडून तिकडे फरफटावे लागत आहे आणि या नव्या घरामध्ये वडिलांचा धाक आणि उत्तम आदर्श त्यांच्यापुढे नसतात. हे दृश्य जेव्हा संशयवादी पाहतात तेव्हा ते निराशेने हवालदिल होतात. यातून काय मार्ग काढावा, हे त्यांना कळत नाही व मग अगतिकतेने 'आलिया भोगासी असावे सादर' अशी त्यांची वृत्ति बनते. ते अशा प्रकारे प्रवाहपतित बनतात, त्यांची प्रगति होत नाही; भविष्यात काही तरी वेगळे घडेल अशी ते नुसती वाट पहात आहेत.

अधिक धीट वृत्तीचे लोक म्हणतात की जीवनाचा अंतिम हेतु जगणे हाच आहे. जे भित्रे जगायला भितात, त्यांची कीव करायला हवी, कारण जीवनातील आनंद व उद्दीपन दोन्ही त्यांना मिळत नाहीत. ते जीवनाकडे डोळे उघडून पाहण्यापेक्षा त्यातून घाईगर्दीने पुढे रेटू इच्छितात. त्यातले काही वीरश्रीचे लोक 'पाप' करून अप्रूप आनंदहि मिळवतात. वासना हीच तिच्या अस्तित्वाचे समर्थन आहे. शरीराचे निर्व्याज सुख आत्म्याला कलंकभूत होत नाही. ज्याच्याबरोबर आमचे बौद्धिक सख्य आणि आत्मिक नाते जुळले आहे त्याच्याबरोबर शारीरिक सहवास मिळविण्यात वाईट काय आहे ? मानवांच्या दृष्टीने काही चांगले व काही वाईट असू शकेल. पण निसर्गाच्या दृष्टीने तर सर्व चांगलेच आहे. अशा प्रकारे प्राकृतिक अस्तित्ववादाची वृत्ति धारण करून, हे लोक आपले समाधान मानून घेतात की आज ज्या यांत्रिक कारणामुळे सर्वांना मानवण्याजोगी ही एक तात्कालिक समाजघटना निर्माण झाली आहे ती यांत्रिक कारणे एखादे दिवशी जशी आली तितक्याच निरलसपणे विखरूनहि जातील; तेव्हा जोवर संधि आहे तोवर तिचा फायदा घ्यावा. जर आम्हाला संपूर्ण, सुंदर, साहसमय जीवन जगायचे असेल तर जीवनाचा हा पेला काठोकाठ भरून आकंठ प्यायला हवा, नाही तर मृत्यु तो पेला हातातून हिसकावून घेईल. या वर्गाच्या लोकाना स्वतःच्या वासना लपविणे हे सभ्यपणाचे लक्षण वाटत नाही. दमन किंवा गोपन त्याना आवश्यक वाटत नाही. जीवन एक साहस आहे. सर्व शक्तीचा पुरेपूर वापर हेच एकमेव चांगुलपण. जे लोक रूढ नीतीचा पुरस्कार करतात त्यांचे रक्तच मुळी पातळ असावे, व त्यामुळे त्यांना समजत नसावे की ज्या आमिषाना त्यांची प्रकृति भीक घालीत नाही त्या आमिषाना निकोप प्रकृतीचे लोक कसे बळी पडतात. स्वैर व्यक्तिवादाच्या पुरस्कर्त्यांना स्वतःच्या इच्छांवर कुणीहि लगाम घातलेला खपत नाही व त्यांच्या अनिर्बंध जीवनाच्या प्रवाहाला बांध घालणारी कोणतीहि गोष्ट त्याना आवडत नाही. संयम त्यांच्या

दृष्टीने मूर्खपणाचे बुजगावणे होय आणि शुचिता म्हणजे निव्वळ अंधश्रद्धा. व्यभिचार हे आंतरिक स्वातंत्र्याचे केवळ बाह्य चिन्ह होय. सुप्रतिष्ठित संस्था ह्या जीवनाच्या फार प्रबळ शत्रु ठरतात, म्हणून अधिक सुधारलेली नवीन समाज-रचना निर्माण करण्यापूर्वी ह्या संस्था मोडून काढल्याच पाहिजेत.

## आर्थिक संबंध

अनिर्बंध व्यापाराचा सिद्धान्त आता हळू हळू मागे पडू लागला आहे. समाज म्हणजे करार आणि स्पर्धेच्या स्वातंत्र्याच्या शक्ती जशा कार्य करतील त्याप्रमाणे सहज स्वत:ला जुळवून घेणारे यंत्र नव्हे. अशा प्रकारच्या आर्थिक व्यक्तिवादामुळे समाजात वर एक लहानसा सुखासीन उच्च वर्ग निर्माण झाला आहे व समाजाच्या खालच्या थराला गरिबी आणि दु:खाने गांजलेला एक वर्ग वाढला आहे. ही परिस्थिति अपरिहार्य नाही. व्यक्ति आणि समाज दोन्ही, ज्यांच्यावर आपले कोणतेहि नियंत्रण नाही अशा बाह्य परिस्थितीने बनविले जातात, हे मत सर्वसंमत नाही.

यंत्रापासून अशी अपेक्षा होती की यांत्रिक नीरस श्रमांतून ते आपली सुटका करतील आणि सांस्कृतिक व कलात्मक कार्यासाठी आपल्याला जास्त अवकाश मिळवून देतील. यंत्रामुळे निस्संशय मानवी श्रम हलके झाले आहेत, पण त्यांच्यामुळे मानवी यांत्रिकपणात भरहि पडली आहे. आधुनिक औद्योगीकरणात श्रमाचे सूक्ष्मतम विभाजन मात्र वाढले आहे, व त्यामुळे श्रमिकाची कारागिरीची भावना नष्ट झाली आहे. कारखान्यात गूढता, सौंदर्य, आदर या मूल्यांना स्थान नाही. कारागीर आता नुसता यंत्रगीर झाला आहे. अधिकाधिक उत्पादनाच्या साध्याचे तो निव्वळ एक साधन बनला आहे. त्याच्या वाट्याला आलेल्या कामातील रूक्ष तोचतोपणा शरीराला क्षीण करतो आणि मनाचे मुळीच अनुरंजन करीत नाही. बुद्धि आणि चारित्र्याचा जो विकास कुशल सृजनशील कार्यामुळे होतो तो आता दुसऱ्या प्रकारच्या कृतीतून शोधावा लागतो. कामगार आता कामाच्या क्षेत्रापलीकडे आनंद शोधतात. ते अधिकाधिक वेतन व जास्त रिकामपण आणि शिक्षण, ज्ञानप्राप्ति, मनोरंजन व विश्रांतीची साधने शोधतात. इतक्या त्रासाने मिळविलेला आराम खर्चिक मनोरंजनात नष्ट होतो. टाइम्स स्क्वेअर, पिकॅडिली सर्कस आणि चौरंगी येथे रात्रंदिवस अविश्रांत श्रम करून खूप खर्चाच्या करमणुकी रिकामपणे चालवण्यासाठी शोधल्या जातात, आणि अशा रीतीने दैनंदिन जीवनाच्या मरगळलेल्या भकासपणातून काही सुख मिळविले जाते.[१] श्रमाच्या अवधीत

[१] विल्यम आर्चरचें म्हणणे खरे आहे की, ‘पाप म्हणजे रिकामटेकड्या मेंदूचे कंटाळवाणे-पणा, रितेपणा व थकवा घालवण्याचे किंवा निर्जीव, निरानंद श्रमामुळे येणारी मानसिक ग्लानि घालवण्याचे आश्रयस्थान आहे.’ — ‘नॉलेज अँड कॅरॅक्टर’ ( ज्ञान व चारित्र्य ) पृष्ठ ५, मॉरल एज्युकेशन लीग, लंडन, १९१६

या उच्चतर प्रवृत्ति रोधल्या किंवा दाबल्या जातात. त्यांच्या तृप्तीकरता रिकाम्या वेळेचा उपयोग केला जात नाही. म्हणून रिकामपण हे वरदान म्हणावे की नाही याबद्दल शंका वाटते. कारखान्यातील कामगार गलिच्छ वस्तीतून राहतात आणि आत्म्याला वेश्यालयावर व कॅबेरे-नृत्यांतून पोसतात. 'जेथे तुमचा खजिना असेल तेथेच तुमचे हृदयहि असणार' ही म्हण समष्टिप्रमाणे व्यक्तीलाहि लागू पडते. कोणत्या वस्तु एखाद्या व्यक्तीला किंवा जमातीला जास्त मोलाच्या वाटतात हे पाहायचे असेल तर, फुरसतीचा वेळ कसा घालवितात हे त्याना विचारावे. मानवी वैफल्याचा भयंकर डोंगर पाहून आपल्याला प्रसन्न वाटत नाही. प्रत्येक धर्म सांगतो की श्रम, विश्रांति व पूजन ह्या माणसाच्या गरजा आहेत. आपण एकाच कार्याला लागलेले सहजीवी आहोत ही भावना श्रमातून आपल्याला व्हावी आणि दुसऱ्यांच्या कल्याणासाठी आपण झटावे, अशी धर्माची आपल्यापासून अपेक्षा असते. विश्रांतीमुळे विचारस्वातंत्र्य आणि आत्म-निर्भरता या दोन बाबतीत आपली आपल्याला ओळख पटायला हवी. पूजनामुळे विश्वातील आत्मतत्त्व आणि या विश्वाचा हेतु समजायला हवा. आज श्रम हे माणसाला माणसापासून दुरावण्याचे आणि त्याची सामाजिक प्रवृत्ति मरगळून टाकण्याचे साधन बनले आहे. आज विश्रांतीचा उपयोग मनाचे डोळे बांधण्यासाठी आणि पूजनाचा उपयोग हीन मूल्ये मान्य केल्यामुळे आध्यात्मिक तंतु बोथट करण्याकडे होत आहे. आता आम्हाला आमचे रिते एकटेपण असह्य वाटू लागले आहे. श्रम, विश्रांति किंवा पूजनात एकटे राहणे म्हणजे निव्वळ विजनवास. आम्ही कारखान्यात काम करावे, गर्दीत आनंद लुटावा, मेजवान्यात जावे, समूहशः पाप करावे, आणि झुंडीने पूजन करावे अशी वृत्ति बनते. घरी शांत संध्याकाळ घालवणे, माळरानावर एकटे फिरायला जाणे, आत्म्याचा विकास व मनन करणे आम्हाला कंटाळवाणे वाटते. आमची ही पिढी खरोखरीच झोप उडालेल्या माणसाची पिढी आहे. विज्ञाने आणि शोध जसे गरजे-पोटी निर्माण होतात, तसेच साहित्य, कला, तत्त्वज्ञान व धर्म यांचा जन्म रिकाम-पणापोटी होतो. भौतिक शक्तींत शीघ्र गतीने उच्चांक गाठणाऱ्या या संस्कृतीत मनाचे अधिक सुज्ञपणाचे छंद पुरविण्याला अवकाशच उरलेला नाही. ही वेगांध संस्कृति सर्व प्रकारच्या विश्रांति, अलिप्तता आणि आत्ममननाच्या विरुद्ध आहे, आणि या गोष्टीखेरीज खरे चिंतन शक्य नाही. ज्ञान वाढले पण प्रज्ञा वाढली नाही.

याशिवाय, औद्योगिक युगाने आम्हाला लक्ष्मीचे पूजक बनविले आहे. आता व्यवहारात जवळजवळ असे ठरल्यासारखे झाले आहे की जास्त श्रीमंत होण्यानें आम्ही सुईच्या डोळ्यातून सहज पसार होऊ शकतो. स्वर्गाला पोचण्याचा परवाना म्हणजे संपत्ति. कोणत्याहि साधनानी व काहीहि किंमत देऊन यशस्वी

होणे हाच आमचा आदर्श झाला आहे. सामाजिक श्रेणीत पैसे कमावण्याची धमक किंवा नशीब ज्याच्याजवळ असेल त्यालाच उच्च स्थान मिळते. ही औद्योगिक क्रांति होण्यापूर्वी सामाजिक मूल्यमापनाचे मानदंड निराळे होते. सामाजिक शिडीच्या शिखराकडे संत, विद्वज्जन, कवि व तत्त्वज्ञानी असत. ज्यांची साहित्यिक किंवा आध्यात्मिक महत्ता भौतिक परिस्थितीपेक्षा वेगळी असे तेच अग्रणी मानले जात. जेव्हा गरिबी देखील स्वच्छ, निकोप आणि स्वाभिमानी होती ते दिवस आता संपले आहेत. आता द्रव्यार्जन हा जगातला सर्वात लोकप्रिय धंदा बनला आहे.

औद्योगिक चळवळीचा एक फार भयंकर परिणाम म्हणजे घर नावाच्या संस्थेचा लय. ही गोष्ट अमेरिकेत व रशियात दिसून येते. जेव्हा कुटुंबातील प्रत्येक व्यक्ति आर्थिक स्वातंत्र्याच्या मागे लागते, तेव्हा कौटुंबिक संबंध दुबळे होतात. स्त्री-पुरुष आपापल्या घराबाहेर कामे करतात. आणि मुले घरी झोपली नसतात तेव्हा शाळा-कॉलेजातून काम करीत असतात किंवा फुटबॉलच्या क्रीडांगणावर किंवा चित्रपटगृहांत स्वत:चे मनोरंजन करीत असतात. रशियाच्या बाबतीत ट्रॉट्स्कीने काय म्हटले आहे ते पाहू या. ‘जीवनाच्या समस्या’ ( प्रॉब्लेम्स ऑफ लाइफ ) या ग्रंथांत तो लिहितो, “ जुन्या पद्धतीच्या कुटुंबावर प्रचंड घटनांचा आघात झाला आहे. त्या घटना म्हणजे युद्ध आणि क्रांति. आम्हाला आणखी समाजवादी आर्थिक सुधारणा हव्या. आज जी कर्तव्ये व काळज्या कुटुंबावर कोसळून त्याला शतधा विखंडित व जर्जर करीत आहेत त्यांच्या जाचातून कुटुंबाना मुक्त करता येणे या सुधारणांशिवाय शक्य नाही. धुलाईचे काम सार्वजनिक परीट-घरांतून, जेवण-फराळ सार्वजनिक उपाहारगृहांतून व शिलाईचे काम सार्वजनिक कारखान्यातून व्हायला हवे. ज्याना आपल्या कामात खरोखर रस असेल अशा उत्तम सार्वजनिक शिक्षकाकडून मुलाचे शिक्षण व्हायला हवे. मग पति आणि पत्नीमधील नाते सर्व बाह्य आणि नैमित्तिक लाग्याबांध्यातून मोकळे होईल, आणि मग एकाला दुसऱ्याचे जीवन गिळून टाकता येणार नाही. ” थोडक्यात घर हे स्त्रीचे स्थान नव्हे तसे पुरुषाचेहि नव्हे.

औद्योगिक युगाचा विश्वास नवनव्या गरजा निर्माण करण्यावर असतो. उपभोक्त्याची भूक तो जे उपभोगतो त्यानेच वाढत जाते. भौतिक प्रगतीचा मार्ग म्हणजे अधिक तृष्णा व अधिक प्राप्ति. अशा उत्तेजक स्पर्धेने आम्ही आपल्या जीवनाचा भकासपणा स्वत:पासून लपवू पाहतो. आमचे हे यंत्र-युग जनतेच्या सार्वजनिक गरजा पूर्ण करू इच्छिते; व्यक्तीच्या लहरीना त्यात वाव नाही. कला उपेक्षिली जाते.

### राजकारण

लोकशाही कसोटीच्या अवस्थेतून जात आहे. राजकीय व्यवस्था म्हणून ती फारशी लोकप्रिय नाही. इटली व स्पेनमध्ये ती मोडून पडली. रशिया आणि चीनची तिच्यावर कृपादृष्टि नाही. पूर्व युरोपातील व दक्षिण अमेरिकेतील ज्या भागात लोकांच्या प्रातिनिधिक सरकाराचा जुजबी आभास राखलेला आहे, तेथेहि लोकशाहीविषयी शंका वाटत आहे. लॉर्ड ब्राइसने स्वित्झरलंड आणि स्कँडिनेव्हियासारख्या लहान देशाशिवाय इतरत्र खरी लोकशाही नांदू शकेल की काय याबद्दल संशय व्यक्त केला आहे.

एकछत्री राज्यपद्धतीतून सुटका म्हणून आम्ही लोकशाहीचे स्वागत केले. पण आता आम्हाला लोकशाहीच्या प्रत्यक्ष प्रयोगाबद्दल समाधान नाही. आम्हाला हळूहळू कळू लागले आहे की शासनदेखील एक तांत्रिक कला आहे आणि तीत पारंगत असलेले लोकच प्रशासक होऊ शकतात. लोकशाहीच्या प्रत्यक्ष प्रक्रियेत, देशातील सर्वात योग्य माणसेच प्रशासक होतील अशी संधि क्वचितच लाभते.

राजकारणातहि हल्ली यंत्राचे युग आहे. पडद्यामागे असलेले कोणते तरी रहस्यमय जाळे लोकशाहीच्या नावाने राज्य-यंत्र चालवीत असते. निवडलेल्या प्रतिनिधींना स्वातंत्र्य किंवा स्वतःची इच्छा नसते. कारण, तेहि एका मोठ्या यंत्राचे भाग असतात. मतदारांची मते त्यांच्या आंतरिक निष्ठेमुळे किंवा कायदेमंडळातील युक्तिवादामुळे किंवा त्यांच्या मतदान-क्षेत्रातील लोकमतामुळे बनत नसतात. सर्व वादविवाद बेगडी, चर्चा व्यर्थ आणि लोकशाही फक्त नावाची, असा प्रकार असतो.

लोकशाहीचे सर्वसाधारण परिणाम व्यक्ति-स्वातंत्र्याला पोषक झालेले नाहीत. सर्वात अधिक लोकशाहीप्रधान आणि अत्यंत व्यक्तिनिष्ठ मानल्या जाणाऱ्या युरोप-अमेरिकेतहि वैयक्तिक जीवनाबद्दल आदर सर्वात कमी दिसून येतो. स्वातंत्र्यप्रिय आणि मूलभूतवादी देशांत कुक्लुक्सक्लान आणि नॉर्डिकवंशीयांचे इतर सर्व जातीवर व संस्कृतीवर प्राणांतिक हल्ले सर्रास चालू आहेत. आपल्याशी मतभेद असणाऱ्या राजकारणी लोकाना वैयक्तिक सूडाच्या धमक्या देणाऱ्या संघटना तेथे अस्तित्वात आहेत. सोव्हिएट रशियात कोणाहि माणसाला आपला व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नाही. अधिकाधिक तांत्रिक कार्यक्षमता हेच ध्येय असल्यामुळे, प्रत्येक माणसाला एका यंत्रात किंवा साच्यात बसविण्यात येते. जणू काय माणूस म्हणजेहि एक खिळाच. त्याची निवड त्याच्या मार्गदर्शकानी करायची व त्यानुसार त्याला तांत्रिक शिक्षण द्यायचे. तेथे कृतीचे स्वातंत्र्य नाही किंवा वैयक्तिक सदसद्विवेकबुद्धीला वाव नाही.

लोकशाहीची अज्ञान, बेशिस्तपणा व हीन अभिरुचि यांच्याशी गल्लत करण्यात येते. आमची वर्तमानपत्रे हेच सिद्ध करतात. ज्या लोकशाहीत वाचकाना मुख्यत: घटस्फोट, खून, नाच-घर आणि पोलिस-कोर्टे यांच्याविषयीचे मजकूर वाचायला आवडतात, ती लोकशाही फक्त वरवरच सुसंस्कृत मानली पाहिजे. शिक्षणाची सोय बहुसंख्य लोकापर्यंत पोचली असली तरी संस्कृतीची पातळी उंचावलेली नाही. कॉलेजमध्ये जाणे सोपे झाले आहे; पण सुशिक्षित होणे मात्र अधिक कठिण झाले आहे. आम्हाला वाचायला शिकवतात पण विचार करण्याची संथा मिळत नाही. प्रचलित शिक्षण, वर्तमानपत्रे, नभोवाणी, चित्रपट या सर्वांनी साधारण लोकांच्या मनात जुजबी पण बरीच परिणामकारक स्वरूपाची खोगीरभरती केली आहे. फ्रॉइड आणि युंग, वर्तनवाद ( बिहेवियरिझम् ), संततिनियमन आणि अशाच कित्येक थिल्लर विषयांचे धड आकलन न झालेल्या चिंध्या त्यांत भरलेल्या आहेत. ज्याच्याजवळ अधिक ज्ञान आहे ते खरे बोलायला भितात आणि सर्वसामान्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालतात. शब्दप्रामाण्य आणि परंपरा यांचे स्थान अपरिष्कृत लोक-लहरी आणि वर्गनिष्ठ असंतोष यानी घेतले आहे. जे प्रश्न आम्हाला भेडसावतात त्याना जोखून पाहण्यास आम्हाला वेळहि नाही व बळहि नाही. ज्या पुढाऱ्याजवळ समतोल दृष्टिकोण आहे त्यांच्यावर विश्वास ठेवण्याचीहि आमची वृत्ति नाही. जनता ही सर्वात महत्त्वाची शक्ति असल्यामुळे, थोडयाशा विचारवंतापेक्षा जनतेच्या मताचा वरचष्मा गाजत आहे. ग्रेशॅमचा सिद्धान्त आहे की वाईट नाणे उत्तम चलनाला हळू हळू काढून टाकते, तद्वत् मानसिक चलनामध्ये देखील उत्तम सुव्यवस्थित विचारांची जागा निरंतर उतावळे, अंधप्रवृत्तीवर आधारलेले वाईट विचार घेऊ लागतात.

सर्वच प्रकारच्या लोकशाही राज्यपद्धतीमध्ये विचाराना व समजुतीना साचेबंद करण्याची प्रवृत्ति दिसून येते. आपली मने यांत्रिकपणे काम करतात. मनाचा हा यांत्रिकपणा सर्व सृजनक्षम कार्यांना मारक आहे. जगातील कोणतीहि श्रेष्ठ कृति एका विशिष्ट साच्यात विचार करून कधीच निर्माण होत नाही. सामान्य चाकोरीवरून वर चढलेल्या विचारवंताच्या अंतर्दृष्टि, निदिध्यास आणि एकान्त मननातून ती निर्माण होते. लोकशाही प्रत्यक्ष आचरणात लोकशाहीविरोधी बनते, असे म्हणण्यात वदतो व्याघात असला तरी ते खरे आहे. तिचा हेतु व्यक्तीबद्दल आदर हा आहे. 'माणसा, माणूस बन,' असे इब्सेनने म्हटले आहे. पण आमच्या लोकशाहीची मात्र अपेक्षा अशी आहे की आम्ही जवळ जवळ अशा एका रूढ साच्यात बसले पाहिजे की ज्यात आमचे आंतरिक जीवन अतृप्त राहण्याची भीति आहे. जर सर्व विचारामध्ये आमचे एकमत होऊ लागले तर विचारांची प्रगति होण्याची शक्यताच नाही.

जेथे इतकी आर्थिक विषमता आहे तेथे राजकीय समता येऊ शकत नाही. मजूर, समाजवादी व साम्यवादी संघटना सरकार आणि शासनयंत्र काबीज करू इच्छीत आहेत. आणि सर्वांचीच इच्छा अधिक उत्तम समाजव्यवस्था प्रस्थापित करावी अशी आहे. त्यासाठी राष्ट्रांच्या सीमा मोडून वर्गविरोधावर भर दिला जात आहे. राष्ट्रीयता ही भांडवलशाही भावना आहे. आणि मजुराना राष्ट्रवादी पूर्वग्रहांच्या कचाटयातून मुक्त केलेच पाहिजे असे बोलले जात आहे. बोल्शेविक म्हणतात, " माझा देश म्हणजे माझा वर्ग. " आणि जोपर्यंत वर्ग-विरोध नष्ट होत नाही तोवर खरी लोकशाही नांदू शकत नाही.

कोणत्याहि समाजाचे राजकीय जीवन त्यातील स्वतंत्र मने व इच्छाशक्ति असलेल्या व्यक्तींच्या संख्येवर अवलंबून असते. समाजजीवनाच्या स्वास्थ्यासाठी विचार आणि आचार यांचा मेळ आवश्यक आहे. तो हल्लीच्या व्यवस्थेत शक्य नाही. मानवी कारभार अधिक चांगल्या रीतीने चालवण्यासाठी मतदानाच्या जुगारापेक्षा अधिक चांगला उपाय शोधून काढला पाहिजे.

## *आंतर्राष्ट्रीय संबंध*

मानवतेबद्दल प्रेम बाळगणाऱ्या कोणाहि व्यक्तीला आंतर्राष्ट्रीय परिस्थिति समाधानकारक वाटणार नाही. राष्ट्रें एकीकडे शांततेचा घोष करतात आणि दुसरीकडे युद्धाची तयारी चालू ठेवतात. संघर्षाला कारणीभूत होणारी घडण सोडायला ते तयार नाहीत. आपण इतर लोकासारखे नाही म्हणून ते ईश्वराला धन्यवाद देतात. त्यांची अशी ठाम समजूत आहे की ज्या मानववंशात त्यांचा जन्म झाला तोच सर्वात शुद्ध आणि उत्तम वंश आहे; जो त्यांचा धर्म तोच जगाचे आशास्थान आहे व त्यांचेच राष्ट्र मानवजातीचे नेतृत्व करू शकते. अगदी पाळण्या-पासून आम्हाला राष्ट्रवादाच्या अहंतेचे हे बाळकडू पाजण्यात येते. आम्ही झेंडे फडकावतो, तुताऱ्या फुंकतो, राष्ट्रीय गाणी गातो आणि द्वेषाची स्तोत्रे पाठ करतो. गेल्या महायुद्धात प्रत्येक राष्ट्र स्वतःला संस्कृतीचा एकमेव संरक्षणकर्ता म्हणवीत असे. आणि त्या संस्कृतीच्या नावाखाली प्रत्येक राष्ट्र वाटेल तसे रक्तपात आणि विध्वंस करून त्याचे समर्थन करीत असे. ज्याप्रमाणे एखादा शिकारी कुत्रा कोल्ह्याचा पाठलाग करतो व त्याला क्रूरपणे फाडून टाकतो, त्याप्रमाणे एखादा माणूस तितक्याच निर्घृणपणे आपल्या मानवबांधवाच्या रक्ताचा घोट घेण्यास आसुसलेला पशु बनेपर्यंत त्याची विवेकबुद्धि आणि उच्चतर नैतिक मूल्ये द्वेषाग्नीने व विजिगीषेने पूर्णपणे जाळून टाकण्यात येतात. अर्ध-सत्ये व असत्ये यांचा प्रमाण-बद्ध प्रचार करून आणि दुसऱ्या राष्ट्रांबद्दल व संस्कृतीबद्दल अविरत सत्यापलाप करून, लोकाना जंगली पशूच्या पातळीवर नेण्यात येते. अँटनीने सीझरचा रक्ताने

माखलेला डगला ज्याप्रमाणे उचलून लोकाना दाखविला, त्याच कुशलतेने व त्याच हेतूने कुणीहि सोमाजी गोमाजी वक्ता आपली भाषा व दृष्टान्त वापरतो व म्हणतो– "पहा किती दयनीय दृश्य ! किती भयंकर रक्तरंजित दृश्य ! सूड ! जाळा, पोळा, मारा, कापा !" हाइने नावाच्या जर्मन कवीने एका लहान मुलाचे उद्गार दिले आहेत ते किती खरे आहेत ! एकदा त्या मुलाच्या बापाने त्याला लष्करी निदर्शन दाखविले असता मुलगा म्हणाला, 'हे शिपाई एके काळी माणसे होती; आता त्याना स्वतःची इच्छाशक्ति नाही, त्याना स्वतःचा आत्मा नाही, आशा नाहीत, आकांक्षा नाहीत, एका यंत्राचे ते खिळे आहेत. या यंत्रापुढे मान तुकवण्यास त्याना शिकविण्यात येत आहे, आणि त्या यंत्राचीच पूजा ते कमीअधिक स्वेच्छेनें करीत असतात.' विचारी मानवाना इच्छाहीन गुलाम बनवण्यात येत आहे. जेव्हा युद्धाची तुतारी वाजते तेव्हा सभ्यतेचे बुरखे गळून पडतात. आणि माणसाला पशु बनण्याविना गत्यंतर नसते. उजाड व उध्वस्त शहरे, लक्षावधि जीवांचा संहार आणि कोटयवधि जीवाना घाव; हृदय-भग्न आणि अपमानित स्त्रिया, भुकेली आणि नैसर्गिक मायेच्या छत्राला मुकलेली मुले, द्वेष व लबाडया-चहाडयानी भारलेले वातावरण म्हणजे युद्ध आणि हे युद्ध जे जे मानवी आहे त्यावर घोर अत्याचार होय. जोवर आम्हाला ह्या दानवी धिंगाण्याचा तिरस्कार वाटत नाही तोवर आम्ही स्वतःला सभ्य आणि सुसंस्कृत म्हणविण्याचा आव आणू नये. जोपर्यंत आम्ही मशीनगनने माणसांची, यंत्राने गवत कापावे तशी, कत्तल होऊ देतो आणि न लढणाऱ्या निरपराध, वृद्ध, रुग्ण, स्त्रिया, मुलांसहित सर्व लोकावर विषप्रयोग करू देतो तोपर्यंत पशूना क्रूरपणे वागवू नका अशी हाकाटी करणे आणि अनाथालये, अपंगालये, चिकित्सालये वगैरे बांधणे व्यर्थ आहे. आणि हे सर्व कशासाठी तर परमेश्वराच्या जयजयकारासाठी व राष्ट्राच्या सन्मानासाठी.

युद्धे पूर्णपणे बंद करता येत नाहीत म्हणून आम्ही त्यांचे नियमन करू इच्छितो हे ख़रे, पण त्यांतहि आम्हाला यश लाभत नाही. कारण युद्ध म्हणजे दोन परस्परविरोधी राष्ट्रीय गटातील संघर्ष, आणि त्याचा निर्णय केवळ बलप्रयोगानेच लावायचा असतो. विरोधकाला नमविण्यासाठी बलप्रयोग हेच एकमात्र साधन ठरवले की मग एका प्रकारचे बल व दुसऱ्या प्रकारचे बल यात विवेक करण्याची बुद्धि उरत नाही. विरोधाला शमवायचे आहे ना ? मग आपल्याजवळच्या सर्व प्रकारच्या शक्तीचा उपयोग करू या. काठी आणि तलवार, बंदुकीची दारू आणि विषारी वायु यात वस्तुतः काहीच फरक नाही. विरोध नष्ट करण्याचे साधन म्हणून जोवर संहारक शस्त्राना जगात मान्यता आहे तोवर प्रत्येक राष्ट्र आपल्या शस्त्रांची संहारशक्ति वाढवण्याचाच प्रयत्न करणार. युद्ध हाच एकमात्र कायदा व विजय हाच श्रेष्ठ सद्गुण आणि प्रत्येक राष्ट्राला याच भयंकर मार्गाने जावे

लागणार. एकीकडे युद्धखोरी मान्य करायची व दुसरीकडे युद्धाच्या पद्धतीवर टीका करायची, म्हणजे लांडग्याला कोकरू खाऊ तर द्यायचे पण त्याला खाण्याची रीत कळत नाही म्हणून नाक मुरडायचे, असा प्रकार होतो. युद्ध म्हणजे युद्ध. नियमाना धरून खेळायला तो काही आटयापाटयाचा डाव नव्हे.

आंतरराष्ट्रीयवाद वाढत आहे हे खरे. अर्थशास्त्रज्ञ आम्हाला सांगतात की युद्धापासून आर्थिक फायदा होत नाही. युद्ध हा तोटयाचा व्यवहार होय. आपल्यापैकी काही लोक श्रद्धेने नव्हे पण धोरण म्हणून शांततावादी बनत आहेत. पण आंतरराष्ट्रीयत्वाची भावना फक्त वरवरची आहे. प्रत्येक देशातले, तत्त्वाला धैर्याने एकनिष्ठ राहिलेले काही थोडे लोक वगळल्यास बाकीच्या लोकानी आपली मानवता गेल्या महायुद्धात राष्ट्राच्या वेदीवर बळी दिली. धर्मगुरु म्हणविणारे लोक देखील 'ज्याने देवाला घर बांधून दिले व मग जो त्या देवाच्या शब्दाला तिरस्काराने हसला' त्या मेफिस्टोफेलिसच्या मताचे अनुयायी झाले. चर्चांची रिक्रूटिंग ऑफिसे बनविण्यात आली. बिचाऱ्या देवाचाहि सर्वच पक्षांच्या माथेफिरू प्रार्थना ऐकता ऐकता गोंधळ उडाला असेल, आणि बिचाऱ्या तटस्थ मानवांची काय मन:स्थिति झाली असेल हे जे. सी. स्क्वायरने उत्तम व्यक्त केले आहे :

गॉड हर्ड दि एम्‌बॅटल्ड नेशन्स शाउट
"गॉड स्ट्रेफ इंग्लंड" एँड "गॉड सेव्ह दि किंग."
गॉड धिस, गॉड दॅट, एँड गॉड दि अदर थिंग,
"गुड गॉड!" सेड गॉड, "आय हॅव गॉट माय वर्क
कट आउट."

(परमेश्वराने युद्धपिपासू राष्ट्रांच्या आरोळ्या ऐकल्या. "देवा, इंग्लंडला बेचिराख कर" आणि "देवा, राजाला वाचव." —'देवा हे, देवा ते आणि देवा हे आणखी.' शेवटी देवाने म्हटले, 'देवा देवा, माझे काम आता संपलेच'.)

लीग ऑफ नेशन्स अस्तित्वांत आहे हे खरे. पण ती नुसती यांत्रिक चौकट आहे आणि तिच्या शरीरात अजून आत्मा उदयाला यायचा आहे. परस्पर द्वेष आणि अविश्वासाची भावना व्यापक प्रमाणावर पसरलेली आहे. आंतरराष्ट्रीयतावाद आणि विश्वबंधुत्व फक्त मूठभर लोकांची कल्पना आहे. संपूर्ण मानवजातीच्या मानसात ती अजून रुजलेली नाही. तहानंतर दहा वर्षांनी सुद्धा ऑगस्ट १९१४ चे आकाश निवळलेले नाही. युरोपांत युद्धापूर्वी जितके लोक शस्त्रसज्ज होते त्यापेक्षा जास्त लोक आज शस्त्रसज्ज आहेत. युद्धाला कारणीभूत होणाऱ्या अहंभावना आणि जगद्विजयाचा दंभ ह्या दोन्ही गोष्टी आपल्या लोकातून नाहीशा करण्याची एकाहि राष्ट्राची आज इच्छा नाही. प्रत्येक राष्ट्र केवळ स्वत:लाच थोर म्हणवते. आणि

खरा देशभक्त तोच समजला जातो की ज्याला थिओडोर रूझवेल्टच्या म्हणण्या-प्रमाणे वाटते की "कोणत्याहि नागरिकाला आपल्या देशाबद्दल जे प्रेम वाटते तेच त्याला दुसऱ्या देशाबद्दल वाटणे हे, कोणत्याहि पतीला दुसऱ्या एखाद्या स्त्रीबद्दल स्वतःच्या पत्नीइतकेच प्रेम वाटावे तसे असभ्यपणाचे व अपमानजनक आहे." राष्ट्रीय विद्वेष आणि महत्त्वाकांक्षा यांच्यामुळे शांति म्हणजे फक्त युद्धविराम होऊन बसली आहे. मॅकियावेलीची संशयवादी वचने राष्ट्रांची राजकीय धोरणे ठरवीत आहेत आणि राष्ट्रें स्वार्थी सत्तेसाठी हपापली आहेत; निःस्वार्थी सहकार्यासाठी नव्हे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८८२० वि: निबंध
क्रमांक १५५४ नों दि: ६।२।६९

# ३. समस्या

तत्त्वज्ञान म्हणजे व्यापक अर्थाने कोणत्याहि संस्कृतीच्या इमारतीचा अदृश्य पाया होय. तत्त्वज्ञान हा मूळ आत्मा होय आणि तो हळू हळू स्वत:चे शरीर घडवतो. कोणत्याहि समाजाच्या सुसंघटित चालीरीति आणि संस्थामुळे त्या समाजाचे सदस्य आपल्या आवडत्या मूल्यांचा वेध घेऊ शकतात व जीवनाचा अर्थ आणि प्रयोजन समजू शकतात. कोणत्याहि संस्कृतीची प्रशंसा किंवा तीव्र टीका करताना तिची ही मूल्यपरंपरा आपल्या डोळ्यापुढे असते.

प्राचीन हिंदु दर्शने आणि ग्रीक तत्त्वज्ञान या दोहोत मनुष्यप्राणी ही या विश्वाचीच प्रतिकृति आहे अशी समजूत आहे. मनुष्याला शरीर असते. शरीराला धातूप्रमाणेच वजन आणि परिमाण असते, आणि याशिवाय विवेक आणि आध्यात्मिक आकांक्षाहि असतात. व्यापक अर्थाने मानवी व्यक्तित्व म्हणजे शरीर, मन आणि आत्मा यांची त्रिपुटी होय. माकडाहून फारशी भिन्न नसलेली आपली शरीररचना हेच सिद्ध करते की आपली उत्पत्ति पशुसृष्टि व वनस्पतिसृष्टींतून आहे. प्रोफेसर ईलियट स्मिथ याच्या मते शिम्पांझी वानरापेक्षा आपल्या मेंदूची रचना भिन्न नाही. आपले काही मानसिक गुण पशुसृष्टीशी आपले सामीप्य दर्शवितात. उदाहरणार्थ, आपला उपजत सुस्तपणा, भूमीवर राहणे आणि जागच्या जागी राहून वेलविस्तार करण्याची प्रवृत्ति, राग आणि भीतीसारख्या भावना, इत्यादि. आपली अदृश्याविषयीची तळमळ, आध्यात्मिक आकांक्षा आणि साहसे, उन्नयनाची धडपड, हे गुण देखील आमच्या व्यक्तित्वाचे तितकेच खरे भाग आहेत, आणि त्यांच्यामुळे पुराणें, दर्शनें, धर्म आणि ललितकलांची निर्मिति झाली आहे. मानवविकासप्रक्रियेत आपली आध्यात्मिक ओढ अखंड कायम राहिली आहे आणि विविध रूपानी व्यक्त झाली आहे. उदाहरणार्थ, आधी अंधश्रद्धा, वृक्ष-लतांच्या ठायीं देव मानणे, दंतकथेवर विश्वास आणि शेवटी आजच्या परिष्कृत आणि जटिल दर्शनपद्धति आणि नीतिमूल्यावर आधारित संस्कृति.

आपल्यात अजून बरेचसे असे आहे की ज्याला आजच्या पशुकोटीतील उत्पत्तीचा वारसा म्हणता येईल. तथापि मानव हा मानव या नात्याने पशूहून भिन्न आहे. आपले गुणावगुण, पाप-पुण्य दोन्ही विलक्षण मानवी आहेत. जेव्हा आपण इंद्रियोपभोग आपले जीवनध्येय मानतो, तेव्हा आपण मानवापेक्षा पशूच अधिक आहोत असे म्हणतात. पण कोणत्याहि पशूला केवळ इंद्रियोपभोग हाच आदर्श पुढे

ठेवून माणसाप्रमाणे त्याच्यामागे लागता येत नाही. पशु माणसापेक्षा जास्त सभ्यपणे वागतो, अशीहि उदाहरणे घडतात. काही गोष्टी पशूंना सहजसाध्य असतात, पण माणसांना त्या गोष्टी बऱ्याच प्रयासाने आणि साधनेने प्राप्त कराव्या लागतात. पशूंमध्ये प्रजननापुढे लैंगिक वासना गौण असते. रानटी आणि प्राथमिक अवस्थेतील मानवी जमाती या बाबतीत पशूंच्या जास्त जवळच्या आहेत. आमच्यात जी विचारशक्ति व निवड करण्याची वृत्ति आहे त्यामुळे आम्ही आपला पशुसृष्टीचा वारसा टाकून पराक्रमाच्या स्वर्गाकडे किंवा अधःपतनाच्या रसातळाकडे जाऊ शकतो; म्हणून एखादा माणूस पशूच्या पातळीवर उतरला असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा मनुष्य आणि पशु या दोघाना सारख्याच लागू असणाऱ्या गरजापायी आपण आपल्या मानवी स्वातंत्र्याचा दुरुपयोग केला, असा त्याचा अर्थ होतो.

आमच्यातील पशु-प्रवृत्ति स्वतःच्या पूर्ततेसाठी सतत धडपडत असते. जेव्हा आपल्या सर्व प्रवृत्ति पूर्णपणे तृप्त होतात, तेव्हा आपल्या व्यक्तित्वातील पशु-स्वरूपाचा विकास पूर्ण होतो. माणसाचे स्वत्व शरीरापुरते आणि जीवन-प्रयोजन केवळ शारीरिक विकासापुरते मर्यादित मानले तर आपण निव्वळ शारीरिक शक्तीची पूजा करणारे आणि वासनांची परिपूर्ति हाच जीवनादर्श मानणारे रानटी मानव ठरतो. अशा प्रकारे निव्वळ शरीरविकासाकडेच लक्ष दिले तर त्यामुळे आत्म-तत्त्वाला जडता येईल आणि त्या आत्मतत्त्वाचे अधिकारच नाहीसे होतील. शारीरिक शक्ति आणि शरीरविकास यानाच श्रेष्ठ मानणे हे रानटी-पणाचे लक्षण आहे. अशा समाजात पुरुष स्त्रीला हीन लेखतो आणि तिला भोग्य वस्तु मानतो. कारण त्या शरीराने दुर्बल असतात. उलट स्त्रिया पुरुषाच्या शारीरिक बळाची पूजा बांधतात आणि पराक्रमी व शूर पुरुषाना वरतात.

जो समाज शरीरापेक्षा मनाला जास्त महत्त्व देतो तो सांस्कृतिक मूल्यांच्या दृष्टीने वरच्या पातळीवर असतो. मन व्यापक अर्थाने घ्यायला हवे; त्यात सौंदर्यविषयक विकास आणि नैतिक परिपूर्णता यांचाहि समावेश करायला हवा; म्हणजेच जोपर्यंत मन आत्म्याशी एकरूप मानले जात नाही तोवर संस्कृतीचे ध्येय आपण गाठणार नाही. आपले ज्ञान कितीहि वाढले तरी त्याचा उपयोग उच्चतर आध्यात्मिक ध्येयासाठी न होता शारीरिक व स्थूल वासनापूर्तीसाठीच केला जाईल. वाढत्या गरजांची पूर्ति आणि अधिकाधिक वस्तूंचा संग्रह ह्याच एका इच्छेने आपले जीवन भारून जाते. मानसिक जीवनाची पातळीहि फार खाली येते. भावनांची स्पंदने, बौद्धिक संवेदना, सौंदर्याचा छंद आणि मानसिक उत्तेजना आपल्याला जशा आकर्षित करतात तसे थोर वाङ्मयाचे व श्रेष्ठ कलेचे गहिरे रसग्रहण करीत नाही. यांत्रिक कथानके, गुप्त पोलिसी गोष्टी, शब्दकोडी आपल्याला मोहवितात,

आपले रंजन करतात. या दुसऱ्या सांस्कृतिक पातळीवर असलेल्या समाजातील व्यक्ति स्वतः विचार करीत नाही, तर निर्बुद्ध गतानुगतिक मार्गाने चालते. तिची नैतिक प्रकृति ओबडधोबड व अविकसित असते. आवडी-निवडींचा, पूर्वग्रहांचा व दृढमूल धारणांचा तो एक पुंज असतो. रूढ नीतिनियमांच्या केवळ अनुसरणाने त्याचे जीवन बनते. त्यामुळे स्वास्थ्य आणि वरपांगीपणाव्यतिरिक्त त्याच्याजवळ दुसरे मानदंड नसतात. आर्थिक संघर्षाच्या चढाओढीत यश मिळविण्यासाठी उपयोगी पडते, एवढीच त्याला शिक्षणाची किंमत वाटते. विज्ञानाला तो मानतो ते केवळ त्यापासून उपयुक्त ज्ञान मिळते, त्यापासून सुख आणि स्वास्थ्य शक्य होतात, आणि त्यामुळे संघटनशक्ति वाढते आणि त्यामुळे अधिकाधिक उत्पादनासाठी यंत्रे तयार करता येतात म्हणून. बाह्य व्याप वाढल्याने आंतरिक संस्कृति मात्र वाढत नाही. अजूनहि युद्धे होतात – मात्र ही युद्धें आता मानवी बाहुबलाची नसून यंत्रांची असतात. आता आम्ही एकमेकांचे बंधू नसून भक्ष्य आहोत. आणि जोवर आमचा स्वार्थ अनियंत्रित आहे, तोवर आम्ही अधिकच भयंकर आहोत; कारण आमची विनाशक शक्ति सहस्रशः वाढली आहे. रूढीचे गुलाम झाल्यामुळे आम्ही सर्व आत्म्याने दास्यवृत्तीचे झालो आहोत. अमुक सिद्धान्त अन्तिम आहे किंवा आपली संस्कृति सर्वश्रेष्ठ आहे, असे एखाद्या समाजाने ठरविले की त्यातील व्यक्ती त्यासाठी लढायला लगेच तयार होतात. धार्मिक छळाचा इतिहास सिद्ध करतो की शारीरिक शक्तीवर श्रद्धा हेच जीवनाचे मुख्य तत्त्व बनते. अशा समाजातील काही थोडे लोक सामान्यापेक्षा उंच पातळीवर जातात. त्याना वाटते की मानवतेचे अंतिम ध्येय विश्वकुटुंब आहे आणि त्यात एका सर्वव्यापी प्रेममय परमात्म–तत्त्वाचा आविष्कार आहे. प्रेमाने अंतःकरणे जिंकण्यातच सर्वांचे हित आहे, त्यासाठी बलाचा प्रयोग निषिद्ध आहे. अशा लोकाना बंडखोर आणि पाखंडी ठरविले जाते व समाज त्यांचा काटा काढतो, भित्र्या लोकाना जरब दाखवून वळवण्यात येते. जे समाजाच्या विरुद्ध जातात त्याना नष्ट करण्यात येते. समाजाची ही अवस्था आर्थिक किंवा बौद्धिक रानटीपणाची अवस्था असते. कारण अशा अवस्थेत सभ्यतेची ऐषआरामाशी, नीतिमत्तेची रूढीशी, धर्माची कर्मकांडाशी व राजकारणाची व्यापार–शोषण व बाजारपेठ यांच्याशी गल्लत करण्यात येते.

केवळ प्राणकोष आणि शरीराकडे सर्व लक्ष देणाऱ्या समाजात उच्चतर मानसिक आणि आध्यात्मिक आदर्शांच्या ऐवजी शारीरिक आणि आर्थिक जीवन आणि वैज्ञानिक व तांत्रिक सामर्थ्य यांचेच महत्त्व वाढते. असा समाज खऱ्या अर्थाने सुसंस्कृत नव्हे. शरीर, मन आणि आत्मा हे एकाच अविच्छेद्य ऐक्याचे स्वतंत्र ओळखता येणारे घटक आहेत. मानवी प्रकृति ह्या तिघांची मिळून बनलेली आहे.

या तिन्ही घटकांचे ऐक्य साधण हेच संस्कृतीचे खरे उद्दिष्ट होय. या घटकामध्ये विरोध किंवा संघर्ष निर्माण झाल्यावर दुःख मानण्याचे कारण नाही. उलट त्याच्यावर विजय मिळवायला हवा किंवा घटकात मेळ घालायला हवा. मानवाच्या पूर्णत्वासाठी शरीराचे उत्तम आरोग्य आवश्यक आहे; तसेच उत्तम जीवनासाठी समाधानकारक सामाजिक आणि आर्थिक संघटनाहि जरूर आहे. पण ही अंतिम ध्येये होऊ शकत नाहीत. या विश्वाने फार वेदना आणि संघर्ष सहन करून काही अशा व्यक्तींना जन्म दिला आहे की ज्यांना शिव, सुंदर आणि सत्य प्रिय आहे आणि जे नुसत्या पशु–गुणांतील पूर्णत्वाने संतुष्ट होत नाहीत. अर्धवट सुसंस्कृत आणि पूर्ण सुसंस्कृत यातला मुख्य फरक म्हणजे एकीकडे स्वसंरक्षण, स्वप्रतिष्ठा व स्वसंतोष यावर आधारलेला संकुचित आत्मकेंद्रित व्यक्तिवाद आणि दुसरीकडे सर्वांच्या कल्याणाची काळजी घेणारा व स्वार्थ विसरणारा विश्वबंधुभाव या दोहोतील अंतर होय. वस्तुतः खरी माणुसकी म्हणजे व्यक्तिनिष्ठेचे विश्वात्मकतेत परिवर्तन, दैनंदिन जीवनाचे शाश्वत हेतूशी नाते जोडणे होय. ही प्रक्रिया कठिण आहे, पण एकदा आपल्या संपूर्ण प्रकृतीला या ध्येयाची वाट नीट दाखवून दिली की मग हे मनावरचे जूं सहज वाटू लागते व ओझे हलके होते. आजचे मानवी जीवन व जाणीव पशूंचे जीवन व जाणीव याहून जशी वेगळी आहे [१] तसेच आजच्या मानवी जीवन आणि जाणीवेपेक्षा एका नव्या जीवन आणि जाणीवेचा आविष्कार मग घडून येईल.

मानवजातीच्या इतिहासांत पूर्णपणे रानटी किंवा पूर्णपणे सभ्य असे समाज निर्माण झाले नाहीत. कोणताहि समाज पूर्णपणे रानटी किंवा पूर्णतया सभ्य नसतो. कोणत्याहि मानवी संघटनेत सामूहिक नीति-कल्पना, धार्मिक आचार आणि सामाजिक व्यवहार निर्माण झाले नाहीत असे होत नाही. ज्या जमातीत काहीच सदसद्विवेक नाही, जिच्या ठायी नीति किंवा कलेचे प्राथमिक सिद्धान्तहि नाहीत, अशी जमातच सापडणे कठीण आहे. सभ्यता रानटीपणाइतकीच प्राचीन दिसते. आपण एस्किमो, रेड इंडियन, बासुटो, फिजि द्वीपवासी वगैरे लोकाना रानटी म्हणतो, याचे कारण ते लोक सभ्य समाजाविषयीच्या आपल्या कल्पनेपर्यंत पोचलेले नाहीत. त्यांच्या समाजात शाळा, दवाखाने, न्याय-कचेऱ्या, पोलिस चौक्या नाहीत. तथापि जीवनपद्धति, रीतिरिवाज व समजुती यांच्या बाबतीत सुसंस्कृत ग्रीक किंवा रोमन लोकात होती किंवा आजच्या ब्रिटिश व जर्मन लोकात

[१] हिंदू तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत सांगायचे तर जो समाज शारीरिक शक्तीलाच आदर्श मानतो तो तामस होय, जो फक्त गरजांच्या ( प्राणविषयक, शारीरिक व आर्थिक ) तृप्तीनाच आदर्श मानतो तो राजस, आणि जो आध्यात्मिक स्वातंत्र्य आणि विकासाला मुख्य ध्येय मानतो तो सात्त्विक होय.

आहे तितकीच पृथगात्मता त्यांच्यात दिसून येते. त्यांची समाजसंघटना निराळी होती, त्यांचे निसर्गाबद्दलचे ज्ञान अपुरे होते आणि त्यांची साधने ओबडधोबड होती, एवढ्याचसाठी आपण त्या समाजाना असभ्य किंवा रानटी म्हणू शकत नाही. आज देखील आपण राजकीय दृष्ट्या मागासलेल्या राष्ट्रांना अर्धसभ्य किंवा अर्धरानटी मानतो, आणि राजकीय यश किंवा आर्थिक समृद्धि किंवा अधिकाधिक मानवसंहारकौशल्य हीच सभ्यपणाची कसोटी मानून चालतो. लढाईमध्ये जपानने रशियाला पराभूत केले तेव्हा जपानला आपण सभ्य मानू लागलो, पण हीच कसोटी लावल्यास सुंग वंशाचा नाश करणारे तार्तार किंवा रोमन साम्राज्याचा विध्वंस करणारे रानटी लोक देखील सभ्य मानवजातीचे आदर्श मानावे लागतील.

अगदी आदिम जमातीतहि ज्याप्रमाणे सभ्यतेची व संस्कृतीची बीजे आढळतात, त्याचप्रमाणे सुसभ्य समाजामध्येहि बराचसा रानटीपणा बाकी असतो. हूण, गॉथ, व्हँडल, तुर्कोमान या लोकाना आपण रानटी समजतो, पण आम्हाला ही खात्री आहे काय की पुढे कधी तरी एखादी अधिक विकसित मानवजात आमच्या आजच्या सभ्यतेकडे एक अर्धसभ्य समाजाच्या अंधश्रद्धा आणि अत्याचारानी बरबटलेला हा समाज होता असे म्हणून आश्चर्याने व तिरस्काराने पाहणार नाही ? ज्याप्रमाणे आज आपण रोमन लोकांच्या ग्लॅडिएटर सामन्यांना वाईट म्हणतो त्याचप्रमाणे आपले वंशज देखील आपल्या क्रुद्ध जनावरांचे सामने व पैसे लावून लढविल्या जाणाऱ्या झुंजी यांचा निषेध करतील. मग आपल्या युद्ध नावाच्या 'सुधारलेल्या' कत्तलीबद्दल तर बोलायलाच नको.

सभ्यता किंवा संस्कृति जणु आमच्यातच आहे. आमच्या नीतिकल्पना, धार्मिक विचार आणि सामाजिक दृष्टिकोण यांत ती साठवलेली आहे ! वस्तुतः फक्त वाफेने चालणारी जहाजे आणि आगगाडी, टेलिफोन व टाइपरायटर आम्ही वापरतो म्हणून केवळ आपण स्वतःला सभ्य म्हणू शकत नाही. एखाद्या माकडाला सायकल चालवायला, पेल्यातून पाणी पिण्याला व चिलीम ओढायला शिकवले तरी ते माकडच राहाते. तांत्रिक निपुणतेचा नैतिक विकासाशी काही संबध नाही. प्राचीन भारत किंवा ग्रीस किंवा मध्ययुगीन इटली निश्चित विज्ञाने आणि यांत्रिक संघटना ह्या बाबतीत आजच्या मानाने फारच खालच्या पातळीवर होते. पण त्याना आध्यात्मिक मूल्यांचे आणि जीवनकलेचे अधिक स्पष्ट आकलन झालेले होते, हे नाकारता येणार नाही. संस्कृति म्हणजे जर वस्तूंचा हपाप किंवा संपत्तीसाठी वेड्यासारखी धडपड नसेल तर भारत, चीन किंवा प्राचीन ग्रीसपासून जीवनकलेचे बरेचसे धडे आम्हाला घेता येण्यासारखे आहेत. याचा अर्थ असा नव्हे की त्या संस्कृति निर्दोष होत्या. ग्रीसमध्ये नागरजीवनात स्वास्थ्य आणि ज्ञान पसरवणे शक्य झाले, कारण समाजासाठी आवश्यक असलेले धंदे परिश्रमपूर्वक करणाऱ्या

बहुसंख्य लोकाना ह्या दोन्ही गोष्टी नाकारण्यात आल्या होत्या. हिंदू संस्कृतीने स्थानिक रीतिरिवाज व समजुतीच्या बाबतीत समंजस सहिष्णुता दाखवून हळू हळू या देशातील मूळ जमातीना आपल्यात सामावून घेतले व एक स्वतंत्र एकजीव समन्वय संस्कृति निर्माण केली. तथापि मागासलेल्या लोकांच्या शिक्षणाची त्यांनी उपेक्षा केली. हिंदू आदर्श कितीहि स्तुत्य असले तरी ते जनसाधारणापर्यंत पोचले नाहीत. काही काळाने एकतंत्र राज्यपद्धतीखाली स्वतंत्र मानवता खुरटल्यानंतर हे उच्च आदर्शहि ढासळले.

आधुनिक सभ्यता आर्थिक रानटीपणाच्या अवस्थेत आहे. भौतिक जग आणि त्याचे सामर्थ्य यावरच तिचे जास्त लक्ष आहे. अध्यात्म आणि त्याच्या विकासाकडे तिचे तितकेसे लक्ष नाही. जे हाती असेल त्याचा अधिकाधिक फायदा उचलावा असे ही सभ्यता आपल्याला सांगते. कारण प्राथमिक व अंतिम सिद्धान्त आपल्या आवाक्याबाहेरचे आहेत. ही सभ्यता म्हणजे पृथ्वीची आर्थिक क्षमता किती वाढवता येईल, भौतिक सुख-समृद्धि किती दूर पसरविता येईल, आणि निसर्गाच्या शक्तीचा मानवी स्वार्थासाठी अधिकाधिक किती उपयोग करता येईल आणि अशा रीतीने मानवी जीवनाची बाह्य स्वरूपे कशी पूर्ण करता येतील, यासाठी अनंत व्याकुळ धडपड आहे. जीव आणि जडद्रव्ये यावर मनाचा पगडा आहे; पण मन, जीवन आणि शरीर यावर अजून आत्म्याचे नियंत्रण नाही. जीवन आणि शरीराच्या नियंत्रणासाठी त्याच्या प्रक्रियांचे आणि संभाव्यतेचे ज्ञान आपण करून घेतले आहे. वैज्ञानिक प्रगतीच्या पहिल्या विजयोन्मादात तत्त्वज्ञानाला दूर सारण्याची व विचारांचा तिरस्कार करण्याची तिची प्रवृत्ति होती व धर्माला जवळ जवळ ठार मारण्यात तिला यश आले होते. आपल्या पूर्वजांपेक्षा आपण जास्त विद्वान आणि शास्त्रीय झालो असलो तरी त्यांच्यापेक्षा आपण कमी जंगली आणि अधिक मानवी झालो आहोत असे मात्र म्हणता येणार नाही. आमच्या शिक्षणाने आम्हाला बौद्धिक दास्यातून मुक्त केलेले नाही. ते आमच्या मनाला उत्तेजित करते, पण समाधान देऊ शकत नाही. आम्ही कविता वाचतो, कादंबऱ्यांचा फडशा पाडतो, चित्रपट पाहतो व आपण सुसंस्कृत झालो असे मानू लागतो. आमची बुद्धिवादी प्रवृत्ति बेगडी आहे. आम्ही विवेकाचा उपयोग आमच्या निसर्गप्रवृत्तीना गोंजारण्यासाठी करतो. जे आपल्याला करावेसे वाटते त्याच्या समर्थनासाठी आपण बहाणे शोधतो व आपल्याला ज्या गोष्टीवर विश्वास ठेवावासा वाटतो त्यांच्यासाठी आपण युक्तिवाद मांडतो. "भले करण्यासाठी हिंडत राहावे" यावर आमची मोठी श्रद्धा; मात्र त्यात 'भले करणे' हा भाग कमी व हिंडण्याचाच भाग जास्त. आम्ही बाह्यात्कारी जगतो, मानवतेच्या आदर्शाच्या गप्पा मारतो, शब्दांची चलनी नाणी उधळतो. पण वस्तुतः नवे विचार आमच्या मनात मुळीच शिरत

नाहीत आणि शिस्त आम्हाला ठाऊक नाही. जुन्या काळी मूर्ख, विकारवश, भोळसर अशी माणसे वेळप्रसंगी मोठी वीरश्री दाखवायची, आणि कित्येकदा विश्वास बसणार नाही इतक्या क्रूरपणे वागायची; त्या जुन्या माणसापेक्षा आज आपण फारसे वेगळे नाही. हिंस्र पशूप्रमाणे माणूसहि अजून माणसाळलेला नाही. आर्थिक यश हा आमचा उच्चतम आदर्श, आणि आमच्या सर्व लढाया आर्थिक कारणामुळेच घडतात. अर्थशास्त्र हाच आमचा धर्म. साम्राज्य हा आमचा मोठा व्यापार. आम्ही व्यापार वाढविण्यासाठी, राज्यविस्तारासाठी आणि वसाहती मिळविण्यासाठी युद्धे लढतो. व्यापार व बाजारपेठासाठी, मनात शंका उत्पन्न होऊ नये म्हणून आम्ही आमचे बौद्धिक स्वातंत्र्यहि बळी देतो. मजूरवर्गांचे शोषण करण्याची आणि मागासलेल्या जमातीवर राज्य करण्याची आमची क्षमता कमी होऊं नये म्हणून आम्ही आमची सहानुभूति बळी देतो. आमच्या निष्ठुरपणाला बाध येऊ नये म्हणून आमची कल्पनाशक्ति मारतो. आमची संस्कृति व्यक्ती आणि समूहांच्या परस्परसंघर्षावर आधारलेली विजिगीषु संस्कृति आहे, तीत झुंजेचा आणि विजयाचा हर्ष आहे. वेग आणि धाष्टर्च, साहस आणि उत्तेजना, अधीर चिकीर्षा आणि माथेफिरू गजबजाट यांचे तीत मिश्रण झाले आहे. पण तिची वासना अनिवार्य आहे आणि कधीच संतुष्ट न होण्याचा तिला अभिशाप आहे.

वेग, संख्या, एकसारखेपणा, व भौतिकतेत पूर्ण समरसता या यांत्रिक गुणामुळे आध्यात्मिक जीवन सुकलेले आणि संवेदनशून्य झाले आहे. आंतरिक एकतेचा अभाव आणि सर्वसामान्य मानसिक अराजकतेने आम्ही पीडलेले आहोत. एकीकडे स्वातंत्र्य, सौंदर्य, प्रेम, सद्गुण वगैरे गुण खऱ्या मानवी जीवनाचे आदर्श म्हणायचे, सांगायचे आणि दुसरीकडे शारीरिक जीवन, त्याच्या स्थूल गरजा, प्रवृत्ति, वासना-विकाराना वाहिलेले निकृष्ट मानसिक जीवन व स्थूल उपयोगितावादी व्यवहारनीति यांच्याविषयी निर्बुद्ध आसक्ति बाळगायची, असा आमचा खाक्या आहे. शारीरिक रानटीपणा पूर्णपणे आमच्यातून गेलेला नाही. 'पवित्र वासना' 'दैवी आग', 'भुयारातील मंदिर', 'निसर्गाच्या निकट असलेला उदात्त मानवपशु', 'पंचमहाभौतिक जगताचा आवाज' इत्यादिविषयी आपल्याला वाटणारे कौतुक आणि शरीराविषयीची आपली नवी भावना यात हीच आसक्ति दिसून येते. विकारोद्रेकाला आपण पवित्र मानतो आणि विवेकशून्यतेला शुचितेचा बुरखा चढवतो.

जग आंधळ्या परिणामशून्यतेच्या हाती नाही. इतिहासाचे तर्कशास्त्र नावाची एक शक्ति आहेच. लॉर्ड ॲक्टन आम्हाला बजावतो की "आधीची तीन हजार वर्षे वगळून केवळ चारशे वर्षांच्या अनुभवावर आम्ही कोणतेहि तत्त्वज्ञान उभारू शकत नाही." (दि स्टडी ऑफ हिस्टरी). आम्ही भूतकाळातील संस्कृतींच्या विकास व ऱ्हासाचा आढावा घेतला तर असे आढळून येईल की ज्या लोकानी केवळ

राजकारण, राष्ट्रभक्ति आणि एकमेकाला नेस्तनावूद करणे याच उद्योगात आपली शक्ति वेचली त्यानी स्वत:ला आतून किंवा बाहेरून नष्ट केले. पाषाणयुगातून पाश्चात्य युरोप बाहेर येण्याच्या कितीतरी आधी इजिप्त, बाबिलोन, ॲसीरिया, क्रीट, खाल्डिया ह्या संस्कृति बऱ्याच प्रगत अवस्थेप्रत पोचल्या होत्या. डॉ. ॲलेक्झँडर इर्विनने सुचविल्याप्रमाणे, आपण गेल्या ६००० वर्षांच्या इतिहासापुरतेच आपले लक्ष मर्यादित ठेवले आणि शंभर वर्षे म्हणजे एक मिनिट मानून घड्याळ चालविले तर असे आढळून येईल की बारा वाजता इजिप्त व बाबिलोन अग्रभागी येतात; बारा वाजून पाच मिनिटानी क्रीट, दहा मिनिटानी ॲसीरिया आणि पंधरा मिनिटानी खाल्डिया मध्यभागी येतील; चिनी व भारतीय संस्कृतीविषयीची युरोपियन अनुमाने प्रमाण मानली तर बारा वाजून वीस मिनिटानी चीन, भारत आणि मीडिया यांचा क्रम लागतो. पंचवीस मिनिटानी इराण अग्रेसर आढळेल तर साडेबारा वाजता ग्रीस पुढे येईल. बारा वाजून पस्तीस मिनिटावर ॲलेक्झँडर काही साम्राज्ये नकाशावरून पुसून टाकीत आहे, आणि बारा चाळीसला रोम राज्य करीत आहे. पंचेचाळीस मिनिटावर आधुनिक बलाढ्य युरोपीय राष्ट्रांचा उदय होत असलेला दिसेल. पुढच्या दहा मिनिटापकी प्रत्येक मिनिटागणिक एक साम्राज्य किंवा राज्य नकाशावरून पुसले जाते व दुसरे उद्‌भवते; आणि एक वाजण्याच्या काही सेकंदापूर्वी पहिले महायुद्ध झाले. आशियाई संस्कृति आजवर टिकून राहिल्या यावरून त्यांच्या ठिकाणी मानवी व आध्यात्मिक मूल्यांची संजीवक शक्ति आहे हे स्पष्ट आहे. आशियातहि युद्धे झाली व योद्धे राजेहि झाले, पण त्याना उच्चतर जीवनाबद्दल प्रेम असल्यामुळे, युद्धाच्या धाडसाबद्दल जे आकर्षण आजहि युरोपीय लोकांच्या ठायी दिसून येते, ते त्याना वाटले नाही. अधाशी लालसेने लष्करी सामर्थ्याच्या बळावर सबंध जग काबीज करण्याचे वेड डोक्यात घेतलेल्या ॲसीरियाची शेवटी दुर्दशा झाली. कारण त्याने लहान तोंडी मोठा घास घेण्याचा प्रयत्न केला. युद्धाचा दुर्धर रोग जडलेला प्राचीन ग्रीस स्वत:च नामशेष झाला. जेव्हा रोमने सबंध ज्ञात जगावर विजय मिळवला आणि पूर्व आणि पश्चिमेकडून अप्रतिहत खंडणी घेण्याचा सपाटा चालविला तेव्हा सबंध जग त्याच्या हाती आले पण त्याचा आत्मा मात्र हरपला. लग्नाच्या बाबतीतील बेजबाबदारपणा रोमन विलासाच्या मध्यान्हकाळी इतका वाढला की त्या राष्ट्राचे अध:पतन भयंकर स्वरूपात सुरू झाले. एका पुरुषाने तेविसावी बायको केली व एका स्त्रीने एकविसावा नवरा केला, असा दाखला रोमच्या इतिहासात मिळतो. लग्नांचे करार होत, ते मोडले जात व परत करार होत. जणू काय लग्न म्हणजे घरगुती सामानाच्या अदलाबदलीचा सौदा होता! रोममधील विचारवंतानी रोमच्या या आध्यात्मिक थिल्लरपणाबद्दल रोमची कानउघाडणी केली होती. इतिहासकार लिव्हीने म्हटले,

"आम्हाला आमचे दुर्गुण आणि त्यांच्यावरील उपाययोजना दोन्हीहि असह्य आहेत." टॅसिटसने रोमचे अत्यंत निराशाजनक चित्र रेखाटलें. जुव्हेनालने बोचक उपरोधाने त्याचा उपहास केला. पण बहुसंख्य जनतेने हा बारीक आवाज ऐकला नाही, आणि रोमचे वैभव नष्ट झाले. साम्राज्यामागून साम्राज्ये कोसळली; कारण सगळ्या जगावर कब्जा करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. संस्कृति-मागून संस्कृति ऱ्हास पावली. कारण आध्यात्मिक दृष्टया त्यांचे दिवाळे निघाले होते. 'विष्णुपुराण' नामक हिंदू ग्रंथाचा कर्ता आम्हाला सावध करीत म्हणतो, माणसाचा दर्जा मालमत्तेवरून ओळखला जावा; संपत्ति हेच शील बनावे, वासना हाच पतिपत्नीतील एकमेव दुवा उरावा, जीवनातील यशाचा पाया असत्याने घातला जावा, उपभोग हा केवळ लैंगिकच मानला जावा, आणि आंतरिक धर्माला बाह्य बंधनांचे स्वरूप द्यावे, अशी अवस्था जेव्हा समाजात येईल तेव्हा ईश्वर कल्कीच्या रूपाने नवा अवतार घेईल असे समजावे.[१] ग्राम्य आणि रानटी आदर्श फार काळ टिकून राहिले तर आपले जीवन कुजून जाईल आणि आपली संस्कृति स्वतःच्याच भाराखाली कोलमडून पडेल. वस्तुस्थिति स्पष्ट आहे आणि इतिहासाचे नियम निर्घृण आहेत, त्यातून सुटका नाही. जे तरवारी उपसतील ते तरवारीनेच नष्ट होतील. एखादी कृति यशस्वी होते ती तिच्या आत्मशक्तीमुळे होते; भौतिक बलामुळे नव्हे. संस्कृतीचा ऱ्हास होतो तो तिच्यात आध्यात्मिक शक्ति आणि जिवंतपणा न राहिल्यामुळे. जोपर्यंत आपण तरवारीवर विसंबू आणि आत्मशक्तीचे शासन मानणार नाही, तोपर्यंत आमचे भवितव्य अंधारलेले राहील. ज्या समाजात लोभ प्रधान आहे, स्पर्धा हाच ज्याचा पाया आहे, जिथे संघर्षाचा निवाडा शरीरबलाने होतो, जेथे ज्ञान उथळ, कला भावनावश आणि नीतिमत्ता शिथिल आहे, तो राजस समाज होय, सात्त्विक नव्हे. असा समाज फार काळ टिकू शकत नाही. आध्यात्मिक पुनरुज्जीवनच विनाशाकडे जाणाऱ्या जगाला वाचवू शकेल. प्रेषिताचे शब्द आम्हाला आठवतात, "वळून पहा, वळून पहा, मरतोस कशाला?" हे शब्द आम्ही धडधडीत खोटे ठरवू काय? "इतिहासापासून आम्ही इतकेच शिकतो की मानवजात इतिहासा-पासून काहीच शिकत नाही," ह्या हेगेलच्या भयंकर विधानाला तर आम्ही पुष्टि देणार नाही? केवळ संस्कृतीचेच नव्हे, मानवजातीचे भवितव्य आज संकटात आहे. तथापि आमच्याच हातानी ते घडविले जाणार आहे. मानव-जातीकरता जग सुरक्षित बनविणे हे आपल्या हाती आहे.

---

१ अर्थ एव अभिजनहेतुः, धनम् एवाशेषधर्महेतुः, अभिरुचिरेव दांपत्यसंबंधहेतुः, अनृतमेव व्यवहारजयहेतुः, स्त्रीत्वमेव उपभोगहेतुः, ब्रह्मसूत्रमेव विप्रत्वहेतुः, लिंगधारणमेव आश्रमहेतुः ॥ (४, २४, २१)

निराश होण्याचे कारण नाही. या पृथ्वीग्रहावर आम्ही मानव फार अलीकडे आलो आहोत, तेव्हा आम्ही अजून पुरेसे सुधारलो नसलो तर त्यात नवल कसले? आमच्यापुढे बराच काळ आहे. खगोलशास्त्रज्ञ सांगतात की अजून एक कोटि वर्षे सूर्य थंड होण्याची किंवा ही पृथ्वी जीवधारणाला अयोग्य होण्याची भीति नाही. आम्ही शारीरिक व यांत्रिक दृष्टयाच नव्हे तर मानसिक व आध्यात्मिक दृष्टयाहि प्रगति करीत गेलो तर मानवजातीचे भवितव्य उज्ज्वल आहे. मी पूर्णपणे आशावादी आहे. आजची ही उलथापालथ जगाचे भलेच घडवून आणील असा माझा विश्वास आहे. आजच्या संस्कृतीचे व तिच्या घटकांचे नि:संकोच विश्लेषण आणि सडेतोड समालोचन तिच्या सुधारणेसाठी आवश्यक आहे. सुस्त कर्मठवादाला धक्के देणे, रूढींना आव्हान देणे आणि भूतकाळाच्या शृंखलांनी विकसनशील मनाला जखडून टाकणाऱ्याविरुद्ध जोराचे तर्कखंडन चालविणे या सर्व गोष्टींचे आम्ही स्वागत करायला हवे. कारण, चुका कबूल करणे हे सुधारणेचे प्रास्ताविक आहे. भविष्यकाळात फार दूरवर पाहणे कठीण असले तरी जिथपर्यंत आम्हाला दिसू शकते, तिथपर्यंतच्या वाटेवर टाकावयाची पावले आपण जाणतेपणी उचलली पाहिजेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३८८२० वि: भीवाध
क्रमांक 9554 नों: दि: ६।२।८७

# ४ पुनर्रचना

## धर्म

कोणत्याहि धर्मात पुनर्धारणेचा महान् प्रयत्न होण्यापूर्वी संशयवादाची जोराची लाट उसळत असते. जुन्या रूढी खंडित होतात, आणि नव्या श्रद्धेचा साहसी मार्ग तयार होऊ लागतो. जणू ज्या वस्तू अचल असतात त्याना प्रकाशात आणावे म्हणूनच सर्व वस्तूना हादरा बसतो. धर्माला चिकित्सेपासून वाचवणे व्यर्थ आहे. मनाला मारल्याने निरोगी बनता येत नाही. कर्मठपणा आणि निव्वळ नकारात्मकता याना मुळीच भविष्य नाही. धर्मापासून आपली सुटका कधीच होऊ शकत नाही. मानवी आत्म्याला अदृश्य वास्तवतेशी मिळते घेण्याची अत्यंत गरज भासते. जोवर माणूस माणूस आहे, त्याला आशा-आकांक्षा आहेत आणि जीवनाच्या अर्थाचा व तज्जन्य दायित्वाचा तो विचार करीत असतो, तोवर धर्मक्षयाची भीति नाही. मग फक्त धर्माच्या पुनर्धारणेचा प्रश्न उरतो. आधुनिक ज्ञानाला व मीमांसेला सुसंगत असे नवे प्रतिपादन करावे लागते. आपल्यापुढे दुहेरी कार्य असते. एकीकडे रूढींच्या जुलुमापासून सुटका करणे आणि दुसरीकडे विच्छेदनशील आत्मनिष्ठेने निर्माण होणारा गोंधळ टाळणे.

कार्यकारणवादाच्या शृंखलेत कालदृष्टचा प्रथम कोणता तरी दुवा निश्चित असावा हे सिद्ध करण्यासाठी कार्यकारणवाद जो युक्तिवाद मांडतो त्याच्या यथार्थतेविषयी कदाचित आपल्याला वाद घालता येईल; पण जेव्हा या विश्वाला आधारभूत असे काही तरी प्राथमिक मूलतत्त्व आहे असे जेव्हा हा कार्यकारणवाद प्रतिपादन करतो, तेव्हा त्याचा युक्तिवाद खोडून काढणे तितकेसे सोपे नाही. विश्वाधार असे काही तत्त्व आहे या प्रमेयाची जेव्हा व्हॉल्टेयरसारखे लोक उपहास करतात व म्हणतात की, चष्म्याला आधार म्हणून नाक बनविले गेले, तसेच हेहि तत्त्व आहे, तेव्हा हे प्रमेय हास्यास्पद वाटते. पण जेव्हा विश्वातील व्यवस्था आणि गतिमानता यांच्यामागे काही योजना आणि उद्देश अवश्य आहे, आणि हा निव्वळ दैवाचा खेळ नव्हे, अशा शब्दांत ते प्रमेय मांडले जाते तेव्हा ते प्रमेय अगदी टाकाऊ म्हणता येणार नाही. विश्वाची वैज्ञानिक मीमांसा नास्तिकवादी मुळीच नाही. खरे म्हणजे विश्वातील अंतिम वस्तूविषयीच्या किंवा विश्वाच्या मूलकारणाविषयीच्या मूलभूत समस्यांशी विज्ञानाचा काही संबंध नाही. सृष्टीच्या काही अंगांचा तेवढा विचार विज्ञाने करतात,

आणि अंतिम प्रश्न तत्त्वज्ञान किंवा धर्माच्या विचाराकरता सोडून देतात. विश्व-निर्मितीच्या प्रक्रियेचे दोन सारखेच मान्य होण्यासारखे व सयुक्तिक अर्थ जर लावता आले तर मानवप्राण्याच्या सर्वोत्तम शक्तीच्या विकासाला अनुकूल असा अर्थ आपण कां पसंत करू नये ? आपण विज्ञानाचे तत्त्व व त्याने उपलब्ध करून दिलेले ज्ञान यांच्याशी एकनिष्ठ असलो तर आपल्याला मानावेच लागेल की या विश्वप्रक्रियेच्यामागे काही आध्यात्मिक वस्तु आहे, आणि तिचे आकलन होणे व तिची व्याख्या करणे कठिण आहे. जड प्रकृतीशी चैतन्यशक्तीचा संयोग आणि त्यामागून मन, बुद्धि व आत्मतत्त्व या गुणांचा उदय ह्या गोष्टी असे दर्शवितात की जीवनात मधून मधून अधःपतन, गतिरोध, क्रूरता व मूर्खपणा यांचा प्रपंच दिसला तरी जीव सतत पुढच्या दिशेने पाऊल टाकीत आहे. हे पाऊल त्याला अधिकाधिक पूर्णतेकडे नेत आहे. मानसिक जीवनांत सुधारणा, सामाजिक सदसद्विवेकबुद्धीचा विकास, परदुःखाविषयी संवेदना, निरनिराळ्या घटकांमध्ये सुसंवाद, यासारखे जे गुण आपल्याला मोलाचे वाटतात ते निरंतर वाढतच आहेत. खुद्द निसर्गातच काही तरी उपजत नैतिक प्रवृत्ति असावी असे दिसते. व्हाइटहेड, थॉमसन, ऑलिव्हर लॉज आणि लॉइड मॉर्गन यांच्यासारख्या वैज्ञानिक तत्त्वज्ञांच्या लिखाणातून स्पष्ट होते की विश्व-प्रक्रियेचा असा आध्यात्मिक अर्थ केवळ भावनेचा किंवा वैयक्तिक कल्पनेचा खेळ नव्हे.

परंतु विज्ञानाने आपल्याला अज्ञेयाविषयी, शाश्वत सत्याविषयी नवी दृष्टि दिली आहे. इतके दिवस आपण आंधळ्याप्रमाणे या अज्ञेय अनंत तत्त्वासाठी चाचपडत होतो. ही नवी दृष्टि जुन्या प्रत्ययाला लाथाडीत नाही, पण जुन्या अंधश्रद्धेला मात्र धक्का देते. ही दृष्टि मनुष्याने स्वतःकरिता निर्माण केलेल्या देवांच्या कित्येक प्रतिमा फोडून टाकते, आणि त्याच वेळी या विश्वप्रक्रियेमागे काहीं आत्मतत्त्व आहे ही वस्तुस्थिति प्रतिपादन करते. ते अनंत-तत्त्व म्हणजे स्वर्गात उभा केलेला कोणी देहधारी देव नव्हे, किंवा कुंभार जशी मातीची भांडी घडवतो तशी सृष्टि घडवणारी कोणी व्यक्ति नव्हे, किंवा बिघडलेला मुलगा परत घरी आला म्हणून आनंद मानणाऱ्या बापासारखेहि ते तत्त्व नाही. आमच्या ठायी आणि यच्चयावत् वस्तुजातात सामावलेले ते एक विश्वात्मक तत्त्व होय. विश्वाचा आधार आणि त्यात भरून राहिलेले आणि शिवाय अनंतपणे उरलेले असे ते तत्त्व आहे. समुद्रात जसे मीठ, किंवा पुष्पात जसा सुवास तसे ते विश्वांत भरले आहे. काही सुसिद्ध नियमानुसार त्याचे कार्य चालते. आणि या किंवा त्या व्यक्तीसाठी त्या नियमात अपवाद करता येत नाही. आपण जर काही चूक केली तर कोणताहि दैवी मुक्तिदाता आपला उद्धार करायला धावून येणार नाही. नियमभंगाला क्षमा नाही. एकहि गेलेला शब्द परत येत नाही, एकहि पाऊल

मागे घेता येत नाही. भविष्यकाळ कितीहि स्वतंत्र असला तरी भूतकाळ मात्र आखून टाकलेला आहे.

हे परम तत्त्व मानवी मनासमोर विविध रूपाने व्यक्त होते. व्यक्तिगत जीवापेक्षा उच्चतर, अधिक कल्याणप्रद व प्रभावी म्हणून मानलेल्या अदृश्य सत्याशी मानवाने संबंध स्थापित करण्याचे निरनिराळे मार्ग शोधून काढले आहेत. सर्वांतर्यामी एकच ईश्वर आहे असे मानणारा हिंदु ईश्वरवाद आणि अनेकेश्वरवाद, सद्धर्म हा निर्वैयक्तिक पण निर्वाणदाता वैयक्तिक असे मानणारे बौद्धदर्शन, निसर्ग हाच देव मानणारे प्राचीन जुने मत आणि त्यातील वैयक्तिक देव-देवता, हिब्रू लोकांची सदाचाराच्या अविकारी प्रभूवरील श्रद्धा, एकीकडे दूरचे व्यक्तिगत देव आणि दुसरीकडे अधिक जवळच्या गौण देवता (मॅडोन्ना ते संरक्षक संतगणादि) मानणारे कॅथॉलिक ख्रिस्ती मत, प्रॉटेस्टंट पंथाचा व्यक्तिगत ईश्वर, मुस्लिमांचा एकेश्वरवाद, ही त्याच सत्याची भिन्न भिन्न रूपे होत. मानवी स्वभावाचे वैविध्य मान्य केले तर त्याला प्रतीत होणाऱ्या ईश्वराची ही विविधता सहज समजण्यासारखी आहे. मग ईश्वरविषयक सर्व सिद्धान्त एकाच सिद्धान्तात गोवण्याची निष्फलताहि सहज लक्षात येईल. या सर्व सिद्धान्तांच्या विविधतेत एका परम-तत्त्वाची कल्पना निहित आहे, तिची व्याख्या केलेली नाही व ती करताहि येणार नाही. धर्माची विविधता अनेकदा वैराला निमित्त झाली आहे. साऱ्या मानवजातीसाठी एकच धर्म करण्याच्या खटाटोपाने जगाच्या दु:खात आणि अशांततेत बरीच भर घातली आहे. स्वत:चे मत दुसऱ्यावर लादण्याची इच्छा स्वार्थी वृत्तीला स्वाभाविक आहे. सत्य काय ते आपल्या-जवळच आहे, किंवा आपल्याला लागलेला विश्वाचा अर्थ सर्वस्वी अचूक आहे, असा भ्रम अहंकाराला होतो. वास्तविक प्रत्येक धर्म त्या त्या जनतेच्या आत्म्याचा आणि त्याच्या जीवनाकांक्षांच्या नियमांचा प्रातिनिधिक असतो. प्रत्येक समूहाच्या ठायी एक दैवी तत्त्व असते आणि त्यानेच त्या समाजाचा विकास होतो, जेव्हा एका समाजाचा संपर्क दुसऱ्या समाजाशी येतो, तेव्हा त्या दुसऱ्या समाजाचे विचार व संस्कार तो नव्या मुशीत ओततो. दुसऱ्यापासून आपण जे घेतो त्याची पोपटपंची करण्यापेक्षा ते नव्या मुशीत ओतणे अधिक चांगले. सर्व मानवजातीने एकच धर्म पत्करला तर या जगातील आध्यात्मिक समृद्धि कमी होईल. मानवी मन निष्फल होऊ नये आणि मानवतेचा आत्मा खुरटून जाऊ नये म्हणून आपण कोणत्याहि भूतकालीन धर्माचा अधिक्षेप किंवा अस्वीकार करता कामा नये. "ईश्वराच्या तत्त्वानुसार जे जे चालतात ते सर्वच ईश्वराची लेकरे आहेत." आध्यात्मिक बाबतीत प्रत्येकाने स्वत:च्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून चालले पाहिजे. स्वातंत्र्याचा स्वीकार म्हणजे चूक होण्याचा धोका पत्करणे होय. पण चुका स्वत:च घडतात. त्या दु:खद असतात; पण सत्यशोधनाचा तो काही निष्फळ प्रयत्न म्हणता

येणार नाही. गहन प्रश्नाबद्दल सतत चिंतनाचा निरंतर प्रयत्न करून त्या सुधारता येतात.

भावी धर्म सर्वंकष असला पाहिजे. धार्मिक भावना असलेल्या सर्वांना त्याने आपल्या कवेत घेतले पाहिजे. आणि संप्रदाय व विचारप्रणाली स्वीकारण्याच्या बाबतीत त्याने सर्वांना पूर्ण मोकळीक दिली पाहिजे. कारण, धर्म म्हणजे एक आध्यात्मिक प्रवृत्ति आहे, मनाचा एक स्वभाव आहे, केवळ आधिदैविक सिद्धान्त नव्हे.

उद्याच्या जगात आपली पारख होईल ती आपल्या समजुती किंवा तत्त्वे वगैरे तांत्रिक बाबींनी नव्हे, तर आपल्या जीवनपद्धतीने व चारित्र्याने होईल. जे खरे धार्मिक असतात त्यांची नावनिशाणे काहीहि असली तरी त्यांचा दृष्टिकोन व अध्यात्म एकच असतात. दैवाच्या आघातांनी विचलित न होणारे धैर्य व गांभीर्य त्यांच्याजवळ असते. दुर्धर संकटातहि आत्मा अजिंक्य राहणे हेच तर आध्यात्मिकतेचे सार आहे. ज्यांचा आत्मा समर्थ आहे ते जगरहाटीहून थोर असतात व जग त्यांच्या मुठीत असते. गोळ्यांच्या वर्षावाखाली देखील ते सत्यच बोलतात, आणि अक्षरशः सुळावर चढविले असताहि ते सूडाची भावना मनाला स्पर्शू देत नाहीत. त्यांच्या ठायी अशी विश्वात्मक दृष्टि असते की जिच्यामुळे सर्व ममता आणि स्वार्थ त्याना मूर्खपणाचे व अपुरे वाटतात. मोल न गणणारा त्याग आणि परतफेड न अपेक्षिणारे दान, हेच त्यांचे दैनंदिन जीवन होऊन बसते. आपल्यापैकी कित्येकाना वाटते की अशी निःस्पृह वीरता व गाढता मानवी प्रकृतीला अशक्य आहे. फार तर गॅलिलीचे कोळी किंवा भारतातील दुर्बल मनाचे लोक, अशा पराभूत वृत्तीच्या लोकांच्या सांत्वनासाठी हा गुण फार चांगला ठरेल, परंतु तो आचरणात आणणे अशक्य आहे. पण वस्तुतः प्रत्येक धर्मात परिश्रमशील जीवन आणि निःस्वार्थता यावर भर दिला आहे. धर्म म्हणजे निव्वळ सदाचार नव्हे. जे समाधान फार सवंग ते खरे धार्मिक समाधान नाही. जीवन म्हणजे अखंड सुखोपभोगासाठी धडपड मानणे हे अधार्मिकतेचे लक्षण होय. दुःख हे जीवनाचे एक नैमित्तिक उपांग नव्हे, तर मर्म आहे. दुःख आणि यातनातूनच सर्व उच्चतर यश मिळते. जीवनाचे अंतिम ध्येय प्रेयाची नसून श्रेयाची उपलब्धि हे आहे. आनंदी जीवन व जीवनानंद एकच नाहीत. वेदनेच्या मार्गाने जर ध्येय गाठता येत असेल तर उपभोगाच्या जीवनाइतकेच हेहि जीवन सुखी म्हणावे लागेल. अत्यंत तीव्र दुःखदेखील आपल्या ध्येयसिद्धीला पोषक असेल तर आनंदाने सोसता येते. गोएटेने म्हटले आहे की, " उंची आपल्याला आकर्षित करते, तिथवर जाणाऱ्या पायऱ्या नव्हेत. " लहानसहान गोष्टीत हे सत्य आपल्या निदर्शनास येते. बहुतेक स्त्रियांना फॅशनविरुद्ध जाण्यापेक्षा शारीरिक गैरसोय परवडते. सौंदर्य-प्रसाधन-गृहात

किंवा जोडयाच्या दुकानात होणारा त्रास त्या आनंदाने सहन करतात. माणसात स्वतंत्र इच्छाशक्ति असते आणि ती वापरणे ही त्याच्या जीवनाची प्रमुख आवश्यकता होय. पण विश्वाच्या गरजांशी त्याच्या या स्वतंत्र इच्छाशक्तीचा समन्वय साधायचा असतो. यामुळेच संघर्ष, द्वंद्व आणि दु:ख निर्माण होते, आणि हे सारे दैनंदिन जीवनात व्यक्त होते.[१]

प्रत्येक व्यक्तीचा आत्मा हा एक अविकसित घटक असतो. तो पशुयोनींतील नैसर्गिक प्रवृत्तीतून पूर्णपणे मुक्त झालेला नसतो, तथापि त्याच्यात परिवर्तन घडवून आणण्याची शक्ति त्याच्या ठायी असते. आत्म्याचे आदेश स्वेच्छेने स्वीकारून व त्याच्या नियमानुकूल आपल्या स्वभावाला शिस्त लावून आपण आपला विकास करून घेत असतो. आपल्याला पशुवृत्तीतून आध्यात्मिक जीवनाकडे नेण्यासाठी आपल्या इच्छा-अभिलाषांना नवे वळण लावून आपल्या सुप्त मनाचे नवे उद्बोधन करणे हा एकच उपाय आहे. त्यासाठी संयम आणि शिस्त आवश्यक आहे. नैसर्गिक मानवाला आपल्या उन्नयनाच्या मार्गावर खरा मोह व खराखुरा संघर्ष हे आड येतात. पण हे उन्नयन म्हणजे आपल्या व्यक्तित्वाच्या परिपूर्तीची अवस्था असते. तिच्यासाठी भरावी लागणारी किंमत फार मोठी असली तरी मिळणारे पारितोषिक अधिक मोलाचे असते: सूक्ष्म जीवाणूने आपल्या भक्ष्याचा पाठलाग करण्यापासून साधक जीवनाच्या आध्यात्मिक संघर्षापर्यंत हेतुपुरस्सर प्रयत्नांचा एक निरंतर परंपरासोपान आहे. प्रत्येक पायरीवर आपण आपले ध्येय निवडतो व त्यासाठी साधनें हाताळतो. मात्र, मानवयोनीतच आपण हा प्रयत्न जाणतेपणी व हेतुपुरस्सर करू शकतो.

मनुष्य परिस्थितीचा गुलाम नाहीं की देवांच्या हातातील आंधळे खेळणेहि नव्हे. विश्वात कार्य करीत असलेली पूर्णत्वाची प्रवृत्ति माणसाच्या ठायी स्वत: सुबुद्ध झाली आहे. मानवेतर खालच्या योनीत प्रगति घडते, उलट मानवयोनीत ती जाणतेपणी केली जाते. नेणीवेतल्या बदलांची जागा जाणता हेतु घेतो. आपण आहोत त्या व होऊ शकतो त्या अवस्थामधील द्वंद्वामुळे निर्माण होणारी अस्वस्थता फक्त मानवयोनीतच संभवते. जीवनाचा नियम, प्रगतीचे तत्त्व शोधून काढणारा प्राणी म्हणूनच मानव इतर प्राण्याहून वेगळा ठरतो.

स्वत:ला बदलण्यानेच आपण जगाला बदलू शकू. आध्यात्मिक सुधारणा हाच सर्व सुधारणांचा आत्मा होय असे जे म्हटले आहे ते योग्यच आहे. नव्या संस्कृतीची निर्मिति आपण दैवावर सोपवण्याची गरज नाही. तसे करणे लबाडीचेहि होईल. अजून बरेच करायचे आहे. जग अजून कित्येक बाबतीत अपूर्ण आहे.

---

१ हे विचार अधिक स्पष्ट होण्यासाठी याच लेखकाचा 'हिंदू व्ह्यू ऑफ लाइफ', जॉर्ज ॲलेन अँड उनविन, लंडन, १९२७, हा ग्रंथ पहा.

या जगाची प्रगति मागे खेचणे किंवा पुढे वाढविणे आपल्या हाती आहे. उत्क्रांतिवादाचा धडा स्पष्ट आहे. जीवन अशा कोणत्याहि पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार चालत नाही की ज्यामुळे त्याची प्रगति समाधानकारक शिखर गाठील. जीवन भटकते, घुटमळते, कधी कधी मध्येच तुटते, आणि अनेकदा मागे परत येते. निसर्गाच्या प्रक्रिया हिशेबी नाहीत. प्राचीन इतिहास सांगतो की आपण चुकीची निवड केली तर आज ना उद्या आपण साफ नष्ट होऊ. नवे अधिक चांगले जग निर्माण करण्याच्या प्रक्रियेत आपल्यापैकी प्रत्येकजण वाटा घालू शकतो; पण त्यासाठी विश्वाचा हेतु समजून घेतला पाहिजे आणि त्या हेतूशी समरस झाले पाहिजे. प्रत्येक व्यक्ति म्हणजे एक विलक्षण घटक आहे. त्याच्या ठिकाणी विशिष्ट गुण आहेत आणि जगाच्या कल्याणाचे पृथगात्म कार्य करण्याचे सामर्थ्य आहे. स्वत:चा शोध हे सर्व पूर्णत्वाचे सार होय. जीवनाकडे साकल्याने व सम्यक् दृष्टीने पाहिले असता त्यात आपले स्थान कुठे आहे हे नेमके समजते. प्रत्येक मानवी व्यक्ति काही गुणांचा व कर्तव्यांचा पुंज असतो. त्याचे लक्ष वेगवेगळ्या ठिकाणी जाऊ शकते; आणि हे लक्षाचे केंद्र जसे उंच किंवा नीच त्यानुरूप त्याचे चारित्र्य गाढ किंवा हलके असते. त्याचे आनुभविक ज्ञान कसेहि असो, ही केंद्राची निवड त्या अनुभवाला उजळून टाकते. चिंतनमनानेच आपण आपल्या अवधानाचे केंद्र शोधतो, आणि ते केंद्र आपल्या स्वभावधर्मांना एकत्र सांधू शकते, सृष्टीतील आपले स्थान निश्चित करू शकते आणि जीवनातील आपली भूमिका नीट पार पाडण्याची शक्ति देऊ शकते, मग ती भूमिका कितीहि लहान आणि कितीहि कष्टमय असो. म्हणून शांत चिंतनाची व एकान्ताची आवश्यकता असते.

नैतिक जीवनाला काही आशय आणि सामाजिक मूल्य आहे. निव्वळ उपजत प्रवृत्तिजन्य प्रतिक्रिया किंवा भावनाकुल क्रिया म्हणजे नैतिक आचरण नव्हे. कारण नैतिक आचरणामागे काही विचार असतो, त्याला काही आशय असतो. मानवी स्वभावातील अशुद्ध द्रव्याला आध्यात्मिक हेतूंनी आकार द्यावा लागतो. या द्रव्याला जो आकार दिला जातो तो महत्त्वाचा असतो. मानवी जीवनाचे सर्व आविष्कार अर्थपूर्ण असतात. आणि त्या प्रत्येकाची कसोटी तिच्यातील आशयाने आणि हेतूने होते. आपण नेहमी परंपरागत एकच साचा वापरू शकत नाही. प्रत्येक माणसाजवळ जगाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोण असतो. त्याच्या आप्तमित्रांच्या दृष्टिकोनाहून तो भिन्न असतो. कोणतेहि ध्येय निवडले तरी आपण त्याचे स्वरूप समजून घेतले पाहिजे, त्याच्या शक्यतेवर विश्वास ठेवला पाहिजे, ते तडीस नेण्याचा कार्यक्रम आखला पाहिजे, आणि प्राण पणाला लावून व पडतील ते कष्ट सोसून ते ध्येय गाठले पाहिजे. याशिवाय, आचरण नैतिक असण्यासाठी ते सामाजिक सुरक्षिततेला आणि सुसंवादाला पोषक असले पाहिजे. उत्क्रांतिवादाच्या

प्रक्रियेचे तेच साध्य असते. मानवजातीचा विध्वंस करणारे किंवा विसंवाद निर्माण करणारे कोणतेहि आचरण नैतिक ठरू शकत नाही. नैतिक जीवन प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तित्वाबद्दल आदर बाळगायला शिकवते. दुसऱ्याची महति मानल्याने व त्याच्याशी जुळवून घेतल्याने आपल्या जीवनाला समृद्धि प्राप्त होते. जर फिनिशियन मातांना स्वतःची अर्भके खाण्यापासून मोलोने परावृत्त केले नसते तर दुसऱ्या एखाद्या देवाने ते कार्य केले असते. सर्वच माणसे अपवादात्मक असतात. वैशिष्टच हा गुण आपणा सर्वांना लागू आहे. सुसंवादी ऐक्य हे जगाच्या उत्क्रांतीचे साध्य आहे आणि त्या साधनेत प्रत्येक व्यक्तीला आपापलें विशिष्ट साध्य आपोआप प्राप्त होते.

नैतिक प्रगतीचा नियम हा स्वीकृतीचा आणि साहसाचा नियम आहे असे म्हणता येईल. जेव्हा आपण वैयक्तिक घटक विचारांत घेतो, तेव्हा आपल्याला दिसून येते की त्याच्या ठिकाणी कितीतरी विकार आणि सहजप्रवृत्ति आहेत. आणि तो मानवी प्रकृतीतील जणु कच्चा माल होय. जी नीति या उपजत गुणांचा निषेध करायला व त्याना नष्ट करायला लावते ती आपल्याला संतोषजनक वाटत नाही. जे प्राप्त आहे ते स्वीकारायलाच हवे व त्याच्याच आधारावर आपला उंच इमला बांधायला हवा. पण माणूस हा निव्वळ आहे त्याचा स्वीकार व अवलंबन करून संतुष्ट होत नसतो. त्याच्या अंतःकरणात एक अशी प्रेरणा असते की जी त्याला सतत पुढे उंच नेत असते. जीवनाचे अंतिम उद्दिष्ट निव्वळ आत्मसंगोपन नसून आपली पातळी उंच करणे ही आहे. प्रत्येक व्यक्तीची इच्छा अधिकाधिक आशयपूर्ण जगण्याची आणि जीवनाच्या ऐश्वर्यापर्यंत पोचण्यासाठी स्वतःच्या अतीत जाण्याची असते. नैतिक जीवन म्हणजे केवळ परिस्थितीप्रमाणे जुळते घेणे एवढेच असेल तर जोवर परिस्थिति बदलत आहे तोवर ते संपणार नाही. जीवनाची जी रूपे पूर्वी होऊन गेली त्यांची पुनरावृत्ति करता येत नाही. आणि पुनरावृत्ति करता आली तरी ती करणे इष्ट नाही. मध्ययुगातील सरदारांचा व राजपूत योद्धयांचा प्रकार आधुनिक परिस्थितीत अशक्य आहे. आपल्याभोवतीचे वातावरण स्थिर व अपरिवर्तनीय ठेवता आले तरी आपला प्रश्न सुटणार नाही. आपले आदर्श वारंवार बदलत असतात. आपल्या ध्येयाना अधिकाधिक प्रमाणात सामावू शकेल अशा प्रकारे आपले वातावरण बनविण्यात नैतिक जीवनाचे सार जितके आहे तितके केवळ वातावरणाप्रमाणे स्वतःला बदलीत राहण्यात नाही. साहस नसलेला केवळ स्वीकार व परिवर्तन नसलेले निव्वळ जुळते घेणे याला एक तऱ्हेचे पूर्णत्व म्हणता येईल, पण ते मानवाचे पूर्णत्व म्हणता येणार नाही; ती एक प्रकारची शांति असेल, पण तिला आध्यात्मिक शांति म्हणता येणार नाही. टणक कवचाच्या जीवाप्रमाणे परिस्थितीशी जुळते घेणारी व्यक्ति नैतिक क्षेत्रात वीर ठरणार नाही.

तर जग जसे असायला हवे त्या पातळीकडे निदान बरीच प्रगति म्हणता येईल इतपत जो आपल्या जगाची पातळी उंच नेतो तोच नैतिक वीर ठरेल. वातावरणाशी पूर्ण संवाद साधण्यांत निःसंशय सौंदर्य आहे; पण या बदलत्या आणि बहुरूपी जगात ते जास्त टिकू शकत नाही. निर्व्याज बालकाचे सौंदर्य बदलून त्या जागी कर्तृत्वशील युवक येतो, मग यौवन बदलून वयाची प्रतिष्ठा येते, आणि असेच पुढे चालते. जीवनाच्या वाटेवर विश्रांति कोठली ? यशाचा प्रत्येक टप्पा म्हणजे काही तरी नवीन यशाचा आरंभबिंदु असतो.

आत्म-परिपूर्णता हेच मानवी प्रयत्नांचे अंतिम ध्येय मानणाऱ्या रूढ सिद्धान्ताशी हा दृष्टिकोण उघड विरोधी आहे. सामाजिक उद्धारापेक्षा वैयक्तिक मोक्षच त्याचे उद्दिष्ट होते. व्यक्तिवादावर इतका भर देण्याला कदाचित् धर्माचे प्रभुत्व कारणीभूत झाले असावे. समाजाने धर्माचा उपयोग आपल्या रूढी व संस्थांच्या समर्थनार्थ केला, आणि त्यामुळें ज्यांच्या आध्यात्मिक विकासाला वाव मिळाला नाही त्याना वाळवंटात किंवा जंगलात, मठात किंवा पर्वतशिखरावर पळून जावे लागले. त्यामुळे, समाजाची प्रगति खुंटली. पूर्णत्वाच्या शिखरावर पोचणाऱ्या अपवादात्मक व्यक्ति मधून मधून चमकून गेल्या, पण त्याना खरोखरीच मुक्त किंवा सुरक्षित म्हणता येणार नाही. वस्तुतः क्रोध आणि भय, दुःख आणि संकट यापासूनच नव्हे तर एकाकीपणापासूनहि मुक्ति मिळायला हवी. मानवजातीच्या भवितव्यावर आणि मानवाच्या दैवी शक्तीवर आपला विश्वास असेल तर सर्वांचा उद्धार होईपर्यंत आपण विश्रांति घेऊ शकत नाही. मानवाच्या पूर्णत्वाची शक्यता, मानवाची मूलभूत दिव्यता, आणि ईश्वराच्या राज्यात सर्व मानवजातीची दृढ एकी, हाच सर्व खऱ्या धर्माचा मध्यवर्ति सिद्धान्त आहे. ज्या जीवाने ही आध्यात्मिक एकता व शक्ति संपादन केली, त्याने आपले जीवन केवळ आत्मतुष्टीत किंवा मनोमन करुणेत न घालवता सक्रिय सेवेत घालवले पाहिजे. जोवर जग दुःखी आणि बंधनात आहे तोवर तो स्वतःशी संष्तुट राहू शकत नाही. जोवर बाह्य जग आपल्याशी एकतान झालेले नाही तोवर कोणालाहि पूर्ण आंतरिक सुसंवाद प्राप्त होऊ शकत नाही. ईश्वराच्या साम्राज्याचे आदर्श या पृथ्वीवर जोपर्यंत मूर्त होत नाहीत तोपर्यंत संत-महात्मे बाहेरील जगाला सुधारण्यासाठी व या पृथ्वीवर ते आदर्श हळू हळू अवतरविण्यासाठी शक्तिसर्वस्वाने झटत असतात. जोवर जग मुक्त होत नाही तोवर कुणीच वस्तुतः मुक्त नाही.

सद्‌गुण म्हणजे उच्चतराचा निरंतर शोध; उलट दुर्गुण म्हणजे आत्मतुष्टि. स्वतःबद्दल समाधान निकृष्ट मनाचे द्योतक होय. उच्चतर ध्येयाचे भान सुटणे हे सर्वात मोठे दुर्भाग्य. जोपर्यंत उंच जाण्याची आर्त लागलेली असते तोपर्यंत कोणी कितीहि पापी असला तरी तो सुधारणे शक्य असते. सदसद्विवेकाच्या टोचणीत

आशा साठवलेली असते. विवेकाचा आवाजच बंद केला तर ते जिवंतपणी मरण होय. माणसाचे व्यक्तित्व जितके अधिक विकसित, तितका तो माणूस आपले ध्येय गाठीपर्यंत स्वतःशी कमी संतुष्ट राहील.

ज्याला काही आशय आणि सामाजिक मूल्य आहे असा जीवनाचा कोणताहि प्रकार नीतिमान होय. जीवनाचा कोणताहि आविष्कार, त्या मार्गाने ध्येय साध्य झाल्याशिवाय, आपण टाकून देऊ शकत नाही. मानवी आत्म्याचे ध्येयाशी एकतेचे नाते जोडण्याचे प्रकार मानवी स्वभावाप्रमाणेच विविध असू शकतात. मांगल्याचा प्रभु नाना रूपानी प्रकट होतो. भगवद्गीतेत म्हटले आहे की, 'यद् यद् विभूतिमत् सत्त्वं श्रीमदूर्जितमेववा' ( १०, ४१ ) ते ते सर्व दैवी शक्तीचाच आविष्कार आहे. प्लेटोच्या नामरूपात्मक जगात दृश्य जगातील विविध विषयांची प्रतीकात्मक आदि-रूपें ( archetype ) आहेत. स्वर्गाच्या साम्राज्यात असंख्य वाडे आहेत.

आपल्या उन्नयनाच्या धडपडीत आपण ध्येय गाठू शकलो नाही तरी चिंता नाही. कारण खेळ महत्त्वाचा आहे, खेळात किती गुण कमावले हे महत्त्वाचे नाही. कर्तव्य करणे फक्त आपल्या हाती आहे, कार्य करवून घेणे आपल्या हाती नाही.

वाईटाची कल्पना अभावात्मक आहे. चांगल्याचा अभाव किंवा उणीव म्हणजे वाईटपणा. सतत चांगले होत राहिल्याने आपल्याला अजून किती चालायचे आहे ते अंतर चांगल्याला मोजता येते. चांगल्या-वाईटातील विरोध हा कायमचा नाही. अगदी खरे सांगायचे म्हणजे चांगले आणि अधिक चांगले किंवा वाईट आणि अधिक वाईट यांच्यामध्येच खरा विरोध आहे. चांगले आणि वाईट असे काहीच नाही, तर फक्त उच्चतर आणि निम्नतर, उत्कृष्ट आणि निकृष्ट असेच अंतर आहे. दुसऱ्याला खाली पाडून आपलाच दृष्टिकोण इतरावर लादणे आपण सोडून दिले पाहिजे. विरोधकाला कुचकामी समजून निकालात काढू नये. त्याला आपण सहानुभूति आणि समंजसपणा दाखवायला हवा. आपल्या उराशी बाळगलेल्या ध्येयाला होणारा विरोध सहन करणे कठीण असते, तथापि या बाबतीत आध्यात्मिक मार्गावरील जीव नेमका यशस्वी होतो. जे आहे आणि जे व्हायला हवे या दोहोत दिसणाऱ्या विसंगतीविरुद्ध तो बंड करीत नाही. तो जीवन स्वीकारतो म्हणजे केवळ जे आहे त्याला शरण जात नाही, तर जीवनाचा निषेध करणाऱ्यांचाहि तो आनंदाने स्वीकार करतो. जीवनाच्या एका प्रकाराला दुसऱ्या एखाद्या प्रकाराविरुद्ध उचलून धरणाऱ्यांच्या ठिकाणी जे प्रमाथित्व व निराशा आढळते ती याच्या ठिकाणी आढळून येत नाही. त्याच्या दृष्टीने असहिष्णुता म्हणजे अधार्मिकता. जो प्रामाणिकपणा व निरपेक्षपणा त्याच्या स्वतःच्या ठायी त्याला वाटतो तोच विरोधकाच्या ठिकाणीहि आहे असे तो मानतो. त्याचा धर्म राष्ट्र हाच देव म्हणत नाही किंवा सूडबुद्धीच्या युद्ध-देवतेवर श्रद्धा ठेवीत नाही पण विश्व-

प्रेमाच्या भावनेवर श्रद्धा बाळगतो. धर्माची आपल्याकडून अपेक्षा असते की विरोधाबद्दल आपण क्षमाशील व शांत असावे, आणि ज्यांच्याबरोबर आपला संघर्ष यईल त्यांच्याशीहि सौजन्याने आणि आध्यात्मिक पातळीवरून वागावे. जो कोणी आपला धर्म मानीत नाही तो पाखंडी किंवा निरीश्वरवादी असतो; आणि ज्याच्या समजुती आपल्याशी जुळत नाहीत तो मूर्ख किंवा दुष्ट असतो, असे मानण्याची आपली स्वाभाविक प्रवृत्ति असते. एखाद्या व्यक्तीचे अमुकच मत कां बनले व ते आपल्याला कां आवडत नाही, ही गोष्ट स्वभाव, शिक्षण व ऐतिहासिक पूर्वपीठिका समजून घेतल्याने आपल्या लक्षात येऊ शकते. दुसऱ्या माणसाचा दृष्टिकोण समजून घेणे म्हणजे त्याला क्षमा करणेंच नव्हे तर त्याचे गुणग्रहण करणे व शेवटी उच्चतर सुसंवादासाठी त्याचे हृदय जिंकणे होय. हिंदू पुराणामध्ये रावण आणि हिरण्यकश्यपु वाईटाचे अवतार मानले आहेत, तथापि ते दोघेहि मोक्षाला पात्र गणले गेले आहेत. कारण ते दोघेहि त्यांच्या समजुतीनुसार वीरपुरुष बनण्याचा दीर्घ व मन:पूर्वक प्रयत्न करीत असलेले दिसतात. रावणाच्या पोलादी बाह्य रूपामागे आणि सीताहरणाच्या व रामाला जिंकण्याच्या तामसी कृत्यामागे किती तरी सूक्ष्म संवेदना आणि उदात्त प्रवृत्ति दिसून येतात. सीतेच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल त्याला निरतिशय आदर होता. रामाचा तो कट्टर शत्रू होता हे खरे, पण खोल घावातून तीव्र विरोधाची भावना उद्‌भवत असते हे आपण विसरू नये. ज्य लोकाना समजून घेण्याचा आपण कधी प्रयत्न केला नाही त्यांच्यापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत या दंभाने फुगून जाण्याच्या प्रवृत्तीला आपण आळा घातला पाहिजे. जीवनाच्या सृजनशील कार्याचे आविष्कार असंख्य आहेत. त्यातील प्रत्येकात काही आगळेपणा आहे. जीवनाच्या प्रत्येक प्रकारच्या क्रियेत चांगले आणि वाईट अशी दोन रूपे असतात. कोणतेहि काम असो, ते करण्याची एक चांगली पद्धत आणि एक वाईट पद्धत असते.

परमेश्वराच्या जगात निव्वळ वाईट असे काहीच नाही. सामान्यपणे ज्याला वाईट म्हटले जाते, त्याने आपल्याला विरोध केला असता आपण त्याला प्रतिकार करणे दुष्टपणाचे लक्षण आहे. या बाबतीत आपली वृत्ति स्वीकाराची व साहसाची असायला हवी. जगातील सर्व वाईटाकडे आपण संपूर्ण सहानुभूतीने आणि प्रेममय समंजसपणाने पाहिले पाहिजे. याचा अर्थ मोठ्याने धाकट्याला दया किंवा क्षमा करावी एवढाच नाही. हा न्यायाचा प्रश्न आहे, आणि न्याय हा दया किंवा क्षमा या दोहोपेक्षा मोठा आहे. हा न्याय माणसाला तो जसा आहे तसा मानून चालतो, त्याच्या गुणावगुणासह त्याच्यावर प्रेम करतो आणि सुन्दर स्वभावालाहि कधी कधी, जग ज्याला गुन्हा किंवा पाप म्हणते, ते करण्यास कसे भाग पाडले जाते ते जाणतो. ईडनच्या उद्यानातील ईव्हच्या आचरणाचे परिणाम फार दुःखद

घडले असले तरी त्या ईव्हपेक्षा आपण नैतिक दृष्टया श्रेष्ठ आहोत, असे आपल्या-पैकी कोण छातीवर हात ठेवून म्हणू शकेल? आपण त्या ईव्हच्या काळात आणि परिस्थितीत असतो तर काही निराळे केले असते असे खात्रीने म्हणता येणार नाही. जगातील सर्वात दुष्ट अशा खलपुरुषाचेहि हेतु चांगले आहेत याच आधारावर कोणतेहि साहसपूर्ण सहकार्य शक्य आहे. विरोधकाशी सामना करण्याचा सर्वोत्तम उपाय म्हणजे त्याच्यावर विश्वास ठेवणे. खऱ्या आध्यात्मिक जीवाला भीति किंवा क्रोध ठाऊक नसतो. कोणा हिंदू संन्याशाने नव्हे, तर एका युरोपीय तत्त्वज्ञाने म्हटले आहे की, "वीर पुरुष नैसर्गिक वस्तूना त्यांच्या वास्तवरूपात जितका अधिक समजू शकेल तितके त्याला अधिकाधिक दिसून येईल की भीति किंवा क्रोधाला कुठेच स्थान नाही; त्याने फक्त चांगले करीत राहावे व आनंद मानावा." पण त्याबरोबरच स्पिनोझा हेहि कबूल करतो की, "निर्भय, निःस्पृह जीवन जितके दुर्मिळ तितकेच कष्टमय आहे."

शिवाय, उंचात उंच झाडहि स्वर्गाला स्पर्श करीत नाही. एका लोकप्रिय सुभाषितात म्हटले आहे: "आपल्यातील सर्वात वाईट माणसातहि इतका चांगुल-पणा आहे आणि आपल्यातील सर्वोत्तमांतहि इतके वाईट आहे की इतरांचे दोष काढणे हे आपल्यापैकी कोणालाहि शोभत नाही."

आपल्यातील सर्वात चांगल्या लोकातहि काही दुर्गुण असतात, काही न्यून असते, काही उपजत दुबळीक असते. आपल्या सद्गुणांचा वापर करण्यात काही चूक किंवा अतिशयोक्ति असते. देवाची तशी इच्छा असली तर या दोषापायीच शोककथांचे नायक निर्माण होतात. हे नायक आपल्याला प्रियहि होतात, पण त्यांचे दोष आपल्यातहि असतात म्हणून नव्हे, तर त्यांचा हा असा नाश दैवाने घडवन आणला, सर्वांच्याच ठिकाणी असलेल्या त्या दोषानी नव्हे, म्हणून. या जगात अशीहि माणसे झाली की ज्यांच्या दुष्टपणाला उद्धाराची काहीहि आशा नाही असे जगाने ठरवले होते, पण त्यानीहि आपल्या स्वभावाचे संतपणाला शोभणारे पैलू अनपेक्षितपणे दाखवून आपल्याला चकित केले. मोठेपणाच्या अधःपाताची आणि उद्धरलेल्या वाईटपणाची ही उदाहरणे पाहिल्यावर तरी आपण दुसऱ्याला बोल लावण्यात सावध राहिले पाहिजे. कित्येकांच्या दृष्टपणाचा उगम जटिल सामाजिक परिस्थितीत असतो. ही परिस्थिति निर्माण करण्यात आपणा सर्वांचा हात असतो, पण तरीसुद्धा आपल्यापैकी कुणीहि त्याबद्दल व्यक्तिशः किंवा प्रत्यक्ष जबाबदार नसतो. ऑथेल्लोच्या कथेप्रमाणे, सर्व अपयश अपरिहार्य कसे असते, हे आपल्याला थोर कलावंत दाखवून देतात. शिवाय, बरीचशी वाईट कृत्ये बौद्धिक चुकांमुळे घडतात, हृदयाच्या कृपणपणामुळे नव्हे. केवळ निषेध किंवा निंदेने काहीच हाती लागत नाही. आत दडलेल्या वासनाना व असमंजसपणाला संयमाने उदात्त

बनवण्यासाठी नव्या मूल्यांचे अवलंबन व परिस्थितीशी समन्वय करण्याचे शिक्षण पद्धतशीरपणे व हळू हळू मनाला देत राहणे हाच एक उपाय आहे.[१]

रूढ नीतिमत्तेविरुद्ध चाललेले आधुनिक बंड हे आपली सदसद्विवेकबुद्धि झपाट्याने वाढत असल्याचेच लक्षण आहे. सामान्यत: काही थोड्या व्यक्ती नैतिक नियमामध्ये बदल घडवून आणतात. हे लोक आपले पूर्वग्रह दूर सारतात आणि वास्तवाचा ठाव घेतात. ही वास्तवता आपल्या परंपरेला जशी भासते त्यापेक्षा विकट आणि सूक्ष्म असते. प्रत्येक नैतिक सुधारक हा परंपरावाद्यांच्या दृष्टीने अनैतिक शक्ति असतो. व या परंपरावाद्याना चिंतनात्मक बुद्धीच्या भयप्रद संचारापेक्षा रूढ नीतीची सुखद पुस्तीच आवडते. कारण नीति म्हणजे केवळ सामाजिक रूढींचे चलनी नाणे असते. आणि जो कोणी त्याहून वेगळ्या रीतीने वागण्याचा आग्रह धरतो तो अनीतिमान ठरतो. मात्र त्याची नीच अनैतिकता पुढच्या पिढीत नीतिमत्ता बनते, आणि तिसऱ्या पिढीत ती परंपरेचा भाग बनते. कोणत्याहि एका काळात, काही थोडे लोक तत्कालीन सर्वोत्तम जीवनादर्शांच्याहि पुढचा विचार करतात. काही लोक त्या काळाच्याहि मागेच रेंगाळतात आणि बराच मोठा वर्ग तत्कालीन आदर्शांच्या आसपास घोटाळत असतो. पहिल्या प्रकारचे लोक बंडखोर ठरतात, दुसऱ्या प्रकारचे गुन्हेगार, आणि तिसऱ्या तऱ्हेचे लोक सर्वसाधारण निकोप प्रकृतीचे ठरतात. सर्व प्रगति या बंडखोरांमुळेच घडून येते. परंपरावादी लोकाना रूढ नीतिसूत्रे तपासून पाहण्याची गरज भासत नाही, ते त्या सूत्रावर संतुष्ट असतात, आणि आपला वेळ दुसऱ्याच्या कुटाळक्या करण्यांत घालवितात. या कुटाळक्यातून अनेकदा जीवनाची जी वास्तवता प्रकट होते, ती साध्या सूत्रात बसत नाही. आपल्या सरस सद्‌गुणासाठी आणि वाईटाकडे दुर्लक्ष करण्यासाठी प्रसिद्ध फॅरेसी (सनातनी) लोक येथे कामास येत नाहीत. यांत्रिक जीवन जगणे म्हणज एखाद्या खडकाळ रूक्ष जमिनीवर फिरण्यासारखे आहे. तेथें कोमलतेची किंवा कमनीयतेची हिरवळ उगवत नाही. रूढ नीतिसंहितेवर श्रद्धा असणे चांगले, पण त्या बाबतीत कठोर आग्रही भूमिका घेणे दुष्टपणाचे होय. हे नीतिनियम आपले मार्गदर्शक आणि संकेत-दीप असतात; पण त्यांचे देव्हारे माजवले तर ते आपल्या बुद्धीला आंधळी बनवतात आणि आपल्याला अनीतीच्या गर्तेत लोटतात. नैतिक नियमाना परमपवित्र मानले तर कोणतीहि प्रगति शक्य नाही. जीवन म्हणजे एक मोठे साहस आहे, एखादा आखीव साचा नव्हे. जीवन एक असा खेळ आहे की ज्याचे निश्चित नियम आपल्याला कधीच कळू शकत नाहीत. सद्‌वृत्त जीवन जगण्यास कोणतेहि

[१] जगांतील तथाकथित पापाचे स्थान निश्चित आहे. एका मध्ययुगीन संताने पहिल्या मानवाच्या अध:पाताला 'बीटा कल्पा' (पावन पाप) म्हटले आहे, कारण त्यायोगे दैवी प्रेम व्यक्त होऊ शकले.

अमूर्त नियम उपयोगी पडणार नाहीत; उत्क्रांतीच्या साध्याशी व विश्वाच्या हेतूशी सहकार्य करणारी जिजीविषाच आपल्या कामी येईल. ज्ञानाच्या विकासाने आणि नीतीच्या व सामाजिक संस्थांच्या इतिहासाचे सुबुद्ध आकलन केल्याने आजची अशांतता उत्पन्न झाली आहे. बऱ्याच सुशिक्षिताना वाटू लागले आहे की ज्या सदसद्विवेकबुद्धीवर त्यांचा विश्वास नाही तिचे आदेश ते पाळीत आहेत आणि त्यांच्या दृष्टीने जे कर्तव्य अर्थशून्य आहे तेच ते करीत आहेत. नैतिक जीवनाच्या प्रचलित धारणांचा ते निषध करतात, नैतिक आरोग्य वाढवणाऱ्या प्रथा समाजात आणण्यास ते उत्सुक आहेत. सामान्य मनुष्याच्या भावनाना व पूर्वग्रहाना धक्का बसतो, हा युक्तिवाद नव्या प्रथेला विरोध करण्यास पुरेसा नाही. आपल्या पूर्वजापेक्षा आपण स्वैराचारी आहोत असे जे म्हटले जाते ते अगदी सत्य आहे किंवा आपल्याला सर्वस्वी दूषणास्पद आहे असे मानण्याचे कारण नाही. ते लोक ज्याना आजपावेतो चांगले म्हणत आले त्यापैकी किती तरी गोष्टी आपण चूक म्हणून निकालात काढल्या आहेत. आपल्या अभिरुची किती तरी बदलल्या आहेत. एक काळ असा होता की जेव्हा आपण आपल्या पत्नीला विकत होतो आणि हे कृत्य नैतिक समजत होतो. गुलामाना सुळावर दिले जाते असे, याचे सज्जन सेनेकाला विशेष काहीच वाटलेले दिसत नाही. आपले अलीकडील महायुद्ध सीझरच्या गॅलिक आक्रमणापेक्षा कमी भयंकर नसले तरी सीझर जितक्या सहजतेने युद्धाचे समर्थन करीत असे तितक्या सहजतेने आपण करीत नाही. नीतीच्या क्षेत्रात दिवे मंदावले आहेत आणि तारे चंचल झाले आहेत. पण एका दृष्टीने आपण आपल्या इतिहासातील पूर्वीच्या काही कालखंडापेक्षा निश्चित निकृष्ट आहोत. आपण कोणत्याहि एका साच्यात बसत नाही हे आपले दुर्दैव नव्हे, तर आपली कुवतच मुळी अगदी सामान्य प्रतीची आहे हे आपले खरे दुर्दैव आहे. आपल्या जीवनात व विचारात क्षुद्रपणा स्पष्ट दिसून यतो. या भयंकर न्यूनतेतून आपल्या पिढीला वाचवायचे असेल तर आपण जो काही मार्ग स्वीकारू त्या मार्गावर आपणाला एखाद्या झुंजार वीराप्रमाणे चालावे लागेल. करारीपणा आणि तपस्विता, नियमन आणि विरक्ति, माणुसकी आणि सहिष्णुता या गुणाशिवाय, थोडक्यात म्हणजे सर्वस्वीकृति आणि साहस ह्या सिद्धान्ताचे पालन केल्याशिवाय आपल्याला वीराच्या पातळीवर जाता येणार नाही.

## *कौटुंबिक जीवन*

शारीरिक, प्राणमय, मानसिक, भावनिक, सौंदर्यविषयक आणि नैतिक ही जीवनाची विविध अंगे पवित्र आहेत, कारण त्यांच्याच द्वारा आपण वाढत वाढत दिव्यतर जीवनाकडे जात असतो. आपण शरीराची उपेक्षा करण्याची किंवा प्राणांची

उपासमार करण्याची गरज नाही. आपल्या प्रकृतीच्या सर्व अंगांचा, त्यांच्या उत्कृष्ट स्वरूपात, उन्मुक्त आणि सर्वस्पर्शी आविष्कार करणे हे आपले साध्य असावे. लैंगिक प्रवृत्ति म्हणजे विवाहाच्या संस्थेद्वारा उच्चतर जीवन घडवण्यासाठी लागणारी सामुग्री मानली पाहिजे. सुप्त वासनांच्या आहारी जाणे म्हणजे आकार व आशय या दोहोंचा निषेध होय, बेबंदशाही होय.

आदर्श विवाहात लैंगिक कृतीला पावित्र्य प्राप्त होते, आंतरिक सौंदर्याचे ते बाह्य चिन्ह बनते. खऱ्या प्रेमाला त्याच्या संगोपनासाठी एका सर्वव्यापक ध्येयाची आवश्यकता असते. ज्याच्या प्राप्तीसाठी प्रेमिकानी स्वतःला समर्पित करावे असा आदर्श त्या दोघापुढे असावा लागतो. पति-पत्नी एकमेकाचा स्वीकार करतात, आणि त्या दोघातील विषमतेतून एक सुंदर एकजीविता निर्माण करतात. त्या दोघात जिव्हाळ्याचे नाते निर्माण होण्यासाठी त्या दोघानी मिळून प्रयत्न करावा लागतो, आणि या मार्गात ज्या अडचणी येतील त्याना तोंड देण्याची त्यांची तयारी असावी लागते. या साधनेत त्याना यश मिळवायचे असेल तर त्यानी धैर्य आणि संयम, सहनशीलता आणि औदार्य यांचे अवलंबन केले पाहिजे आणि दोघानीहि सतत जागरूक असले पाहिजे. मानवी वासनावर जरी बुद्धीचा संस्कार होत असला तरी त्यामुळे वासना पूर्णपणे बदलत नाहीत. मानव हा जास्तीत जास्त चांगल्या अवस्थेतहि सर्वस्वी बुद्धिप्रधान असत नाही. बुद्धिप्रधान होण्याचा सतत प्रयत्न करणारा प्राणी, एवढेच त्याचे वर्णन करता येईल. विवाह हा जीवनप्रकार जितका आनंदमय तितकाच दुःखमय आहे. विवाह ही निर्वेध आनंदाची अवस्था आहे. त्यात जर काही बाध आला तर ते विवाहबंधन तोडून टाकले पाहिजे, अशी विवाहाविषयी चुकीची कल्पना करून घेतल्यामुळे घटस्फोट होतात. जोडीदारांचा अप्रामाणिकपणा किंवा व्यभिचार हे सामान्यतः घटस्फोटाचे कारण नसते, तर स्वभावातील विसंवाद आणि आवडी-निवडीतील भिन्नता हीच बहुधा घटस्फोटाला कारणीभूत होतात. आपत्तीतून, अडचणीतून मार्ग काढीत दोन व्यक्तीचा विकास घडवून आणणे हा विवाहसंस्थेचा हेतु आहे हे मान्य केले म्हणजे प्रत्येक आपत्ति ही अधिक प्रयत्नाला आव्हान आहे असे समजले पाहिजे. आदर्श विवाह म्हणजे आपल्या उद्दिष्टांचे सर्वोत्तम साफल्य होय. एकमेकाबद्दल गैरसमज, तापट व लहरी स्वभाव आणि प्रवृत्ति, विचित्र आवडी निवडी आणि असमानता, एवढेच नव्हे तर एकमेकानी काही पापे केली असली तरी आपण एकमेकाला चिकटून राहणे, ही आदर्श विवाहाची अपेक्षा असते. घटस्फोट सर्वथा केव्हाहि अधोगतिच घडवून आणतात. शारीरिक स्वास्थ्य व सुख हेच मानवी जीवनाचे साध्य आहे असे जे मानतात आणि आंतरिक विकास व परिपूर्णता ज्यांच्या खिजगणतीत नसते असे अविकसित व दुबळ्या मनाचे लोकच घटस्फोटाचा

अवलंब करतात. उलट विकसित व्यक्तित्वाचे लोक कितीहि मर्माहत झाले तरी, दुःखाला शक्तिदायी मानून स्वीकारतात व क्षुद्रपणा टाळतात. आजवर स्त्रियानी पुरुषापेक्षा अधिक सहनशीलता दाखविली आहे. स्त्रिया जेव्हा पुरुषावर प्रेम करतात तेव्हा त्याचे दोषच नव्हे तर गुन्हे देखील विसरतात. स्त्रियामध्ये काही तरी आध्यात्मिक सुसंस्कृतता आहे; ती पुरुषानीहि आपल्या अंगी बाणविली तर बरे होईल.

मुले उच्चतर जीवनाला अतिशय सहायक असतात. आई-वडिलाना मुलाविषयी जे उपजत प्रेम वाटते ते मुलांच्या भावभावनात आणि अनुभवात सहभागी होण्याच्या रूपाने प्रकट होते. मुलाविषयीचे आपले कर्तव्य विसरून स्वतःच्या सुखामागे लागणे आणि मुलाकडे पूर्ण दुर्लक्ष करणे ही तर अलीकडच्या काळातील एक विकृत घटना आहे. राज्यसरकारातर्फे बाल-गृहे चालवली जातात, असे आपण ऐकतो; पण ती कधीच लोकप्रिय होऊ शकत नाहीत. मुलाना त्यांच्या-सर्वांगीण विकासासाठी आई-बापांचे वात्सल्य आवश्यक असते. आईबापांची जागा भरून काढता येत नाही. आईबापांचे आध्यात्मिक जीवन जितके सखोल तितका त्याना मुलांचा लळा अधिक. घटस्फोटांची आकडेवारी पाहिल्यास दिसते की बहुसंख्य घटस्फोट अपत्य-विहीन जोडप्यांचे असतात. बहुसंख्य स्त्रियामध्ये व पुरुषातहि अपत्यप्रेम जागृत असते, आणि जोवर हे प्रेम मरत नाही तोवर लग्न म्हणजे यावज्जीव साहचर्य राहणारच.

आधुनिक अशांततेने आपल्याला योग्य इशारा दिला आहे की अज्ञान आणि बाह्य दबाव यावर आधारलेला आपला पळपुटा व साचेबंद सज्जनपणा हा खरा सज्जनपणा नव्हे. ज्ञानावर आधारलेला संयम अज्ञानावर आधारलेल्या भोळेपणापेक्षा चांगला असतो. एकपत्नीत्व हा निस्संशय उत्तम आदर्श असला तरी, त्यामुळे जर लाखो स्त्रियावर लैंगिक दारिद्र्य किंवा व्यभिचार लादला जात असेल तर त्याचा पुर्नविचार व्हायला हवा, हा आधुनिकतावाद्यांचा आग्रह रास्त आहे. स्वैराचारात जितका बेजबाबदारपणा आहे तितकाच तो कठोर व साचेबंद वैवाहिक नीतीतहि आहे. स्त्री व पुरुषाकरता एकसारखे नीतिनियम करायचे असतील तर त्यासाठी त्या नियमांची पातळी खाली आणण्याची गरज नाही. ती अधिक उंच करायला हवी. स्त्रियानी पुरुषाच्या पातळीला खाली उतरण्यापेक्षा पुरुषानी स्त्रियांच्या पातळीवर उंच चढले पाहिजे. नव्या ज्ञानामुळे स्त्रिया युगानुयुगांच्या दंडातून मुक्त झाल्या आहेत; हे नवीन स्वातंत्र्य व ज्ञान कितीहि धोक्याचे असले तरी, जोपर्यंत आपण श्रद्धेने व धैर्याने वस्तुस्थितीला तोंड देत आहोत तोपर्यंत ते आपल्याला खडकावर आदळणार नाही. संक्रमणकाळात अनिष्ट परिणाम घडतील हे खरे आहे. आधुनिक शाळकरी पोरी पूर्वीच्या

पिढ्यातील त्याच वयाच्या मुलीपेक्षा लैंगिक जीवनाच्या बाबतीत अधिक सज्ञान झालेल्या आहेत. त्यांचे आधुनिकतेचे आचरण पाहून नीतिकर्मठाना धक्का बसतो. सहशिक्षण असलेल्या शाळा-कॉलेजातून अनुचित वर्तनाला प्रोत्साहन मिळते.

स्त्रियांच्या मनात आज पसरलेल्या अशांततेचे खरे कारण हे आहे की त्या आपली भूमिका विसरत आहेत. बायरन कवीने म्हटले होते की, "पुरुषाचे प्रेम त्याच्या जीवनाचा एक सुटा भाग आहे. पण स्त्रियांचे ते सर्वस्व आहे." स्त्रियांचे स्थान घरात असते असे आपण समजतो. पण आता ती घरेच कमी होत चालली आहेत. यंत्रानी घरची कामे कमी केली आहेत आणि स्वयंपाकघराऐवजी उपाहारगृहे आली आहेत, त्यामुळे स्त्रियांची बरीचशी शक्ति साठून राहते व तिचा उपयोग करण्यास योग्य विषय मात्र आढळत नाही. पति पूर्वीपेक्षा जास्त कार्यमग्न झाला आहे आणि पत्नीजवळ रिकामा वेळ वाढला आहे. मन व्यग्र ठेवणाऱ्या कामाच्या अभावी ती अधिक दुःखी झाली आहे आणि तिला मनोविकृति जडली आहे. जणू ती अर्थशून्य आणि हेतुशून्य अशी निकामी वस्तु बनली आहे. पैसे आणि वेळ खर्च करून ती आपला रिता वेळ मौजेने आणि उनाडपणात भरून काढण्याचा प्रयत्न करीत असली तर आपण तिला दोष देऊ शकणार नाही. तिचे जुने काम आता उरलेले नाही, आणि नवे मिळालेले नाही. वैवाहिक आयुष्य काही आता पुरेसा किंवा सर्व वेळ व्यग्र ठेवणारा उद्योग पुरवीत नाही. विवाहित स्त्रियांची स्थिति जर इतकी भयंकर आहे तर अविवाहित स्त्रिया, पुत्रहीन स्त्रिया, विधवा आणि ज्यांच्या मुलानी मोठे झाल्यावर किंवा लग्न झाल्यावर त्याना सोडून दिले आहे अशा स्त्रिया यांची स्थिति तर आजच्या व्यक्तिवादी समाजात अधिकच वाईट असली पाहिजे. स्त्रियांच्या सर्व दुःखाचे मूळ म्हणजे त्याना पुरेसे काम नाही. रित्या जीवनाचे हे दैन्य त्याना अस्वाभाविक मार्गाकडे ओढून नेत आहे. त्याना जमतील असे उद्योग त्यांच्यामागे लावून देणे हाच यावर योग्य उपाय आहे.

शारीरिक आनंदाचा बडेजाव वाढवण्यात आधुनिकता चुकीच्या गोष्टीवर भर देत आहे. विवेकाच्या शिस्तीतून न जाताच थेट भावनेच्या झऱ्यातून उसळून आलेली कृति म्हणजे पुन्हा आरंभाकडे, पशुत्वाकडे व रानटीपणाकडे परत जाणे होय. वासनेने नियंत्रकाची भूमिका घेऊ नये; ती विवेकाची भूमिका आहे. आत्माविष्कार म्हणजे इंद्रियोपभोग नव्हे. आपण स्वतंत्र असायला हवे आणि जी अंतरातून स्फुरलेली नाहीत अशी बंधने मानू नयेत हे जरी तात्त्विक दृष्ट्या अगदी खरे असले तरी, अपरिपक्व तरुण मनानी हे तत्त्व आचरणात आणल्यास त्याचे भयंकर परिणाम घडतील. बाह्य बंधनातूनच आंतरिक बंधने निर्माण होतात, आणि बाह्य बंधनांच्या आवश्यकतेपलीकडे जे पोचलेले असतात तेच ती बंधने झुगारण्याच्या

स्वातंत्र्याचे अधिकारी असतात. व्यक्तीला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी, तिला आत्म-नियमन करायला शिकवले पाहिजे. कोवळ्या वयाची आणि अपरिपक्व बुद्धीची माणसे आपल्या शारीरिक इच्छांच्या आदेशानुसार आपले संबंध घडवू लागली आणि मन मानेल तसे वागू लागली तर ते योग्य होणार नाही. लग्नाच्या हेतूविषयी आणि कार्याविषयी खोट्या समजुती करून घेऊन, मौजेखातर किंवा बेजबाबदार वृत्तीने लग्न करणे योग्य नाही. तासभर टिकणाऱ्या लग्नालाहि कायदेशीर मानण्याची अत्याधुनिक कल्पना अत्यंत हास्यास्पद आहे. प्रायोगिक लग्ने हे रखेल्या ठेवण्याच्या प्रथेला कायदेशीर रूप देण्याचा प्रकार आहे. असे विवाह केवळ प्राचीन परंपरेकडेच नव्हे तर मानवजातीच्या भावी ध्येयाकडेहि दुर्लक्ष करतात. लैंगिक समाधान हेच विवाहाचे एकमात्र ध्येय मानले जाते; आध्यात्मिक अनुभूतीला त्यात स्थान नाही. बंधनांच्या विरुद्ध बंड करण्याच्या पहिल्या उत्साहात स्त्रियाना व पुरुषाना कदाचित असे विवाह आवडतीलहि; पण त्यांच्या विचाराना वयपरत्वे पक्वता आली म्हणजे त्याना कळून येईल की लैंगिक, सामाजिक किंवा आध्यात्मिक, कोणत्याहि दृष्टीने असले विवाह हितावह नाहीत.

### *आर्थिक संबंध*

एखाद्या वस्तूचा दुरुपयोग झाला म्हणून तिचा शास्त्रशुद्ध उपयोग करू नये असे नाही. विज्ञान हळू हळू आपल्या हाती अशी शक्ति व साधने देत आहे की त्यांच्या सुबुद्ध उपयोगाने मानवी मूल्ये, मानवी प्रकृतीच्या अधिक विध्वंसक स्वरूपाशी सामना देऊनहि, सुरक्षित राखता येतील. प्राचीन ग्रीकानी गुलाम पाळून संस्कृति व उपभोगाच्या ज्या संधी सर्व समाजाला मिळवून दिल्या होत्या त्या आता विज्ञानाच्या द्वारा आपल्या समाजाला मिळवता येतील. गिरणीच्या कापडापेक्षा हाताने विणलेले कापड जास्त चांगले किंवा मोटारीपेक्षा बैलगाडी उत्तम, असे आपल्याला धर्म सांगत नाही. यंत्रांचे गुलाम न होण्याची काळजी आपली आपणच घेतली पाहिजे. हिरवी शेते किंवा निळे आकाश यांचे दर्शनहि होऊं नये आणि मानव उदासवाण्या खुराड्यात व धुरकटलेल्या शहरात डांबून राहील, यासाठी विज्ञानाचा साधन म्हणून वापर होऊ नये.

श्रम आणि आराम यांच्यामध्ये विरोध निर्माण झाला आहे तो आपण आपल्या कामात रस घेत नाही म्हणून. आपले काम मनोरंजक होईल इतपत आपण त्याच्याशी मनाने एकरूप होत नाही. जगण्यासाठी लागणाऱ्या वस्तु समाजाला मिळाव्यात म्हणून आपण कंटाळवाणे काम करीत राहतो. आपले काम आपण मनोरंजक बनविले पाहिजे आणि कामगारानी कारखान्याच्या व्यवस्थेत भाग घेतला पाहिजे.

मानवी व्यवहाराचे नियंत्रण करणाऱ्या गरजा भौतिक आणि आर्थिक असतात, उदाहरणार्थ द्रव्य, सुख, प्रतिष्ठा आणि सत्ता; किंवा सामाजिक आणि आध्यात्मिक असू शकतात. उदाहरणार्थ, सचोटी, ज्ञान, नि:पक्षपात, सहानुभूति, समंजसपणा, न्याय आणि सेवा. काम म्हणजे केवळ भौतिक मूल्यानी नियंत्रित केलेला एक व्यवहार आहे, अशी आपली वृत्ति असू नये. समाजाच्या गरजा भागविण्यासाठी आपण काम करीत आहोत अशी आपली भावना असायला हवी. वेगवेगळ्या व्यवसायातील कामगारानी एकमेकापासून दूर न जाता, आपण एका जिवंत एकात्मतेची अंगे आहोत अशी जिव्हाळ्याची भावना आपल्यात वाढवली पाहिजे. परस्पराना समजून घेण्याची वृत्ति आमच्यात नाही, ती दूर व्हायला हवी. व्यक्तीच्या आणि समष्टीच्या ठायी मानवी आणि आध्यात्मिक जीवनैक्याची सर्वव्यापी भावना आपण निर्माण केली पाहिजे. वेगवेगळे कार्य करणाऱ्या संस्थानी आपसात समाजबंधुत्वाची भावना वाढवली पाहिजे आणि परस्परावलंबनाच्या वृत्तीने त्या प्रेरित झाल्या पाहिजेत.

संपत्ति म्हणजे सर्वस्व नव्हे. सर्वोत्तम वस्तु पैशाने विकत घेता येत नाहीत. सर्वात प्रिय व संग्राह्य वाटणाऱ्या वस्तु, मनाचे व हृदयाचे सुख, संतोष आणि सद्भाव ह्या गोष्टी पैशाच्या ऐपतीबाहेर आहेत. जीवनात केवळ उपयोगितावादाचा पंथच महत्त्वाचा नाही. माणसे म्हणजे नुसते कामगार किंवा संपत्तीचे निर्माते नव्हेत. ती माणसे आहेत आणि सौंदर्यप्रेम, मनोविकास इत्यादि मानवी मूल्यांचे त्याना आकर्षण आहे. जोवर मानसिक शांति आणि स्वातंत्र्य आपल्याजवळ नाहीत तोवर बाह्य गुणाना अर्थ नाही. माणसाची भौतिक स्थिति सुधारण्याच्या भरीस पडून आपण आधुनिक जीवनाच्या जटिल यंत्रणेचे बाह्य स्वरूप व संस्था बदलून टाकण्यावरच लक्ष केंद्रित करीत आहोत. पण जोवर मानवी प्रेयांची गुणवत्ता आणि परिमाण वाढत नाही तोवर फक्त सामाजिक संस्थात आणि यांत्रिक संघटनात सुधारणा केल्याने काहीच लाभ होणार नाही. जीवनातील दैन्य आणि भकासपणा दूर करण्यास विज्ञान आपल्याला साहाय्य करते, पण आपल्या रिकाम्या वेळेचा उत्तम उपयोग करायला आपण शिकले पाहिजे. या बाबतीत आपल्याला योग्य शिक्षण मदत करू शकेल.

## *राजकारण*

लोकशाहीचा खरा अर्थ समाजाचे स्वराज्य होय. कमीत कमी शासन हे सर्वोत्तम शासन होय. जे लोक मानवी स्वभावाकडे ध्येयवादी दृष्टीने बघत नाहीत ते अधिकाधिक सरकारी नियंत्रणाची मागणी करतात. मानवी स्वभावाच्या रानटीपणावर भर न देता त्याच्या भव्यपणाची जर आपल्याला जाणीव झाली तर

आपण आपल्या स्वभावावर नियंत्रण म्हणून बाह्य यंत्रणेला किंमत देणार नाही. कोणतेहि बाह्य शासन हे स्वयंशासनाचे साधन असते.

लोकशाहीत सामान्यांची इच्छा सार्वभौम असते, असे म्हणतात. पण जकातीत सुधारणा करणे किंवा भारतीय संविधान बदलणे यासारखे तांत्रिक मुद्दे सामान्यांच्या इच्छेने कसे ठरविणार ? बऱ्याच देशात लोकशाही यशस्वी झाली आहे, कारण तिथे खरी लोकशाहीच नाही. लोकशाही हा अजून एक काल्पनिक आदर्शच राहिला आहे. जेव्हा आपण लोकशाही ही व्यावहारिक तत्त्व म्हणून स्वीकारतो तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की मानवी व्यक्तित्वाला काही अविच्छेद्य हक्क आहेत आणि कोणाहि व्यक्तीशी वागताना, मग ती स्त्री असो की पुरुष असो आणि तिचा व्यवसाय कोणताहि असो, आपण त्या हक्कांचा मान राखला पाहिजे. मानवी व्यक्तिमत्त्व पवित्र आहे आणि प्रत्येक व्यक्तीला तिच्या स्वभावानुसार आपला विकास करू दिला पाहिजे. प्रत्येक माणसाला त्याच्या आवाक्यात असलेल्या उत्कृष्ट अवस्थेपर्यंत पोचण्याची संधि मिळायला हवी. माणसामाणसाच्या आंतरिक शक्ति, विशेष प्रवृत्ति किंवा व्यक्तिगत प्रयत्न कितीहि भिन्न असले तरी सर्व माणसे तत्त्वज्ञान आणि वाङ्मय, कला आणि शास्त्रे, कायदा आणि राज्य-नीति या सर्व विषयांचे मूल्य पारखण्यास सारखेच लायक आहेत असे लोकशाही सांगत नाही. आईन्स्टाईनच्या सिद्धान्ताची सत्यता सार्वजनिक मतदानाने ठरविता येणार नाही. मनुष्यप्राणी तर्कनिष्ठ प्राणी आहे म्हणून तो सर्वदा तर्कनिष्ठेनेच वागेल किंवा सर्व विषयात तो आपली तर्कनिष्ठा नीट वापरू शकेल अशी खात्री देता येत नाही. आपण सर्व समान आहोत, असा लोकशाहीचा अर्थ नाही. शरीराने आणि बुद्धीने माणसे जन्मतःच असमान असतात. विषमता ही माणसात नेहमीच राहणार. कोणी लठ्ठ तर कोणी हाडकुळे, कोणी उंच तर कोणी ठेंगू, कोणी मोठे तर कोणी लहान असणारच. भेद कधीच नष्ट करता येणार नाही. कोणतीहि समाजव्यवस्था सर्वांना समान संधि देऊ शकणार नाही, हेहि तितकेच खरे आहे. संधि प्राप्त करणे हे त्या व्यक्तिभोवती असलेल्या सामाजिक परिस्थितीवर आणि त्या परिस्थितीविषयीच्या त्याच्या प्रतिक्रियेवर अवलंबून असते. तथापि, संधीची समानता हा एक उत्तम सामाजिक आदर्श होय. आपण समाजातील अज्ञान आणि दारिद्र्यामुळे निर्माण होणारे अडथळे दूर करून महान कला आणि वाङ्मयाची पाळेमुळे जनतेच्या हृदयात खोल रुजू दिली पाहिजेत. देशाची सांस्कृतिक पातळी वाढवून आपण प्रत्येकाला आत्मशोधासाठी आणि भावना, विचार व संकल्प यांचे ऐक्य साधण्यासाठी वाव दिला पाहिजे लोकशाही ही नैसर्गिक अवस्था नाही, प्रयत्नाने आणि शिक्षणाने साध्य होणारा तो आदर्श आहे. आज राजनैतिक व्यवस्था म्हणून लोकशाही जी दुबळी वाटते

त्याचे कारण व्यक्तिगत मतदाराच्या ठिकाणी प्रामाणिकपणा आणि बुद्धि यांचा अभाव आहे, हे होय. मतदारांची बुद्धि आणि पुढाऱ्यांचा प्रामाणिकपणा जसजसा वाढत जाईल तसतशी लोकशाही जास्त यशस्वी होईल. आदर्शपूर्णतेच्या दृष्टीने ती कितीहि कमी भरली तरी दयाळू एकतंत्री राज्यशासनाचे काही अल्पजीवी कालखंड सोडल्यास, आजवरच्या इतर कोणत्याहि शासनप्रकारापेक्षा ती चांगली आहे. लोकशाहीने सामाजिक शांतता आणि स्थिरता वाढते. कारण, राज्यशासनाला मार्गदर्शन करण्यात मतदाराचा हात असल्यामुळे, सर्व प्रकारची टीका आणि असंतोष लोकशाहीतच मनमोकळेपणाने व्यक्त होऊ शकतो.

## *आंतरराष्ट्रीय संबंध*

परंपरागत आदर्शांच्या, पुण्यशील आशांच्या किंवा सुंदर शब्दांच्या वल्गना केल्याने मानवजातीचें विश्वकुटुंब प्रत्यक्षात उतरवता येणार नाही. त्यासाठी राष्ट्राराष्ट्रामध्ये बंधुभाव आणि सख्य वाढविणे ही पहिली आवश्यकता आहे. एकमेकाबद्दल गैरसमज आणि खोटी राष्ट्रभवित यानी सध्या भयंकर हैदोस मांडला आहे. ज्या देशाबद्दल आपल्याला तिरस्कार वाटतो त्या देशाविषयी आपल्याला ज्ञान नाही असे समजावे. न्यूमन लहान असताना नेपोलियनशी झालेल्या युद्धात पकडलेले फ्रेंच युद्धकैदी लंडन शहरातील रस्त्यावरून जाताना त्याने पाहिले. त्या कैद्याना पाहण्यासाठीं इंग्रज लोकांची दाटी झाली होती. त्या गर्दीतील कांही माणसे अत्यंत गंभीरपणे फ्रेंच शिपायांचे लांब कोट मागून उचलून पाहात की या शिपायाना शेपट्या तर नाहीत ! ही गोष्ट न्यूमनने नमूद केली आहे. म्हणजे इंग्रज लोक इतक्या सहजपणे आणि गंभीरपणे फ्रेंच माणसांना माकड समजून होते. आपणहि आपल्या विरोधकामध्ये माकडाच्या शेपट्या जरी नाही तरी तशीच काही वांशिक वैशिष्टये पाहू लागतो. वस्तुतः आपले शत्रु केवळ मानवच नसून मूर्तिमंत मित्र असतात. अलीकडेच एक खळबळजनक पुस्तक हिंदुस्थानच्या बाबतीत प्रसिद्ध झाले. त्यात सर्व भारतीय जनतेची नालस्ती केली आहे, आणि भारताला पृथ्वीतलावरून नष्ट करण्याचे जरी नाही तरी आजीव गुलामीत ठेवण्याचे समर्थन केले आहे. राष्ट्रे कधी कधी कुत्र्याप्रमाणे एकमेकाचे लज्जास्पद अवयव हुंगण्यासाठीच केवळ एकमेकाजवळ येत असावींत, असे जे कार्लाइलने म्हटले होते ते आजहि लागू पडते. जगाची शांतता सह्या केलेल्या पत्रकावर, कागदी सनदावर, आर्थिक करारावर आणि राजकीय संगनमतावर तितकीशी अवलंबून नाही. सुसंस्कृत माणसांची सदसद्विवेकबुद्धि व मने एकत्र सांधणे आणि ज्ञानाचा व आदर्शाचा परस्पर व्यापार वाढवणे हे त्यासाठी अधिक आवश्यक आहे. आपल्या शेजाऱ्याशी आपले मतभेद असले आणि आपण भौतिक यशाचे व बाजारू

समृद्धीचे भक्त असलो तरी, दिल्याने कमी न होणाऱ्या मानसिक आनंदाकडे व आत्मिक धनाकडे जेव्हा आपण वळतो तेव्हा मानवी स्वभावाची सह-संवेदना हटकून आपल्या अनुभवाला येते. ही आध्यात्मिक संपदाच आपल्याला समंजसपणाकडे व सहानुभूतीकडे वळवू शकेल. जगाची सुरक्षितता ह्या समंजसपणावर व सहानुभूतीवरच अवलंबून आहे.

विचार आणि भावनेचे ऐक्य वाढविण्याबरोबरच युद्धाविषयीची राष्ट्रीय मनोवृत्तीहि बदलायला हवी. मानवजात ही नेहमी युद्धावर विसंबून राहिली आहे आणि पुढेहि नेहमी ती अशीच राहील, असे म्हणणाऱ्या संशयात्म्यावर आपण भरंवसा ठेवू नये. नरमांसभक्षकहि असेच म्हणत आले आहेत की मानवजातीने नेहमीच मनुष्याचे मांस खाल्ले आहे आणि पुढेहि ती खात राहील. गुलामी आणि द्वंद्वयुद्ध वगैरेचे समर्थकहि असेच म्हणत आले आहेत. पण आपण हळू हळू माणसांची मने बदलू शकतो. शांततावाद किंवा आंतरराष्ट्रीयतावाद या बाबी बिनतारी यंत्र किंवा टेलिफोनसारखी वैज्ञानिक साधने नाहीत की जग एकदम त्याना हाताळू शकेल. हे एक नाजूक रोप आहे आणि ते जगवण्याला काळ लागतो. त्याच्या वाढीसाठी धैर्य, सहिष्णुता, परस्परविश्वास आणि आदर आवश्यक असतात. अगदी लहानपणापासून आपण लोकाना मानवतेच्या ऐक्यावर श्रद्धा ठेवायला शिकविले पाहिजे, त्यांच्या ठायी शांतीविषयी इच्छा उत्पन्न केली पाहिजे, आणि स्पष्ट बजावले पाहिजे की युद्धाने यादवी वाढते. नियतीने आणि निसर्गाने ज्याना एक केले आहे, त्यांच्यात युद्धामुळे कृत्रिम विरोध निर्माण होतो. "तुम्ही बंधु-बंधु आहात, मग एकमेकाला त्रास कां देता ?" युयुत्सुपणाच्या आदिम प्रवृत्तीमुळे थोड्या लोकांना लूट मिळते व अधिकांश लोकाना यातना मिळतात. पण याच प्रवृत्तीला मानवी कल्पकतेने जो खोटा साज चढवला आहे त्याचा दंभस्फोट व्हायलाच हवा. जीवनाचे पावित्र्य वाढविणाऱ्या उदात्त मूल्यांचा आपण आग्रह धरायला हवा. युद्धे आपल्याला हिंसेची सवय लावतात आणि जनतेच्या मनात अशा कटु भावना निर्माण करतात की ज्या दाबण्याचा संस्कृति प्रयत्न करीत आहे. ही गोष्ट आपल्याला उमगली पाहिजे. हिंसा, मग ती शारीरिक असो की मानसिक, खालच्या पशुवृत्तीतूनच निर्माण होते. तिच्यात जीवनाचा आशय नसतो, व ती सर्व सामाजिक मूल्यांचा नाश करते.

माझाच देश प्रथम, शेवटी आणि नेहमी अशी शिकवण देणारा राष्ट्रवाद म्हणजे एक प्रकारची अफू आहे. तिच्या नशेत मानवतेच्या उच्चतर दर्शनाला आपण मुकतो, आपली दृष्टि आंधळी होते. 'दि शिकागो ट्रिब्यून' नावाच्या अमेरिकन वर्तमानपत्राचे ध्येयवाक्य आहे, "आमचा देश. इतर देशाशी संबंध ठेवताना आमचा देश नेहमी बरोबर असू दे. पण बरोबर असो की चूक असो,

आमचा देश तो आमचा देश." राष्ट्रीय गौरवाचें किंवा स्वाभिमानाचे योग्य ते महत्त्व आपण नाकबूल करीत नाही. राष्ट्रीय औद्धत्य आणि असहिष्णुता हीच भयंकर आहेत. राष्ट्र-संस्थेला नैतिक नियमांच्या वर मानणारे व त्यापुढे सर्व काही क्षम्य मानणारे राष्ट्रप्रेम खोटे आहे. राष्ट्र कधीच चूक करू शकत नाही, राष्ट्र हे टीकेच्या पलीकडे आहे आणि राष्ट्राने केलेली सर्व युद्धे न्याय्यच असतात, हा राष्ट्र हेच अंतिम तत्त्व मानणाऱ्या वादाचा उद्धट सिद्धान्त सर्वस्वी अधार्मिक आहे. आणि तरीसुद्धा आधुनिक जगाचा तो धर्म झालेला आहे आणि ह्या धर्माने आपल्या अनुयायांपासून भलत्याच अपेक्षा धरल्या आहेत. कोणत्याहि दुसऱ्या धर्माने कधीहि अशा सवंग आणि प्रचंड प्रमाणावर नर-बळींची मागणी केली नाही. जात-राष्ट्र कोणतेहि असो, सर्व जगाचा उद्धार करणे हे बोल्शविकांचे ध्येय आहे. त्यांच्या मते रशिया हे निव्वळ राष्ट्र नसून आपल्या धर्माचा प्रसार करणारी संस्था आहे. केवळ राष्ट्रप्रेमाचाच ते प्रचार करीत असते तर त्यात वावगे नव्हते, तोवर ते योग्य आहे. लेसिंगने म्हटले आहे, " राष्ट्रभक्ति हा वीरांचा दुर्गुण आहे, तो नसला तर उत्तम." बाहुबलापेक्षा श्रेष्ठ असा एक कायदा आहे आणि अभिमानी राष्ट्रप्रेमापेक्षा श्रेष्ठ असे प्रेमहि आहे. राष्ट्रनिष्ठा सबंध मानवजाती-विषयीच्या बृहत्तर निष्ठेशी विसंगत नाही. राष्ट्रे ही मानवजातीचे स्वाभाविक घटक आहेत आणि प्रत्येक राष्ट्र आपल्या विशिष्ट भूतकालाने, ऐतिहासिक परंपरेने प्रेरित होऊन पुढे जात असते. इतराना वगळून एखाद्या विशिष्ट गोष्टीला वाहिलेले अतिरेकी प्रेम धोक्याचे असते. स्वदेशप्रशंसा ही आत्मप्रशंसेइतकीच गर्हणीय आहे. क्षुद्र व्यापारी एजंटाप्रमाणे स्वतःच्या देशातील संस्थांची आणि मतांची स्तुति करणे उपयोगाचे नाही. राष्ट्रीयतेचा अर्थ फुकट फुशारकी नव्हे किंवा असहिष्णुताहि नव्हे.

जगाचे ऐक्य साधण्याचे दोन उपाय आहेत. जगाचे एकराज्य बनवणे किंवा जग एक कुटुंब समजून गुण्यागोविंदाने राहणे. एकराज्य अशक्य आहे, कारण राष्ट्रवाद त्याच्या आड येतो. हे स्वप्न वास्तवतेत आणण्यासाठी कदाचित् संपूर्ण जगाचा सर्वनाश होईपर्यंत युद्ध लढावे लागेल. एखाद्या वंशाचे श्रेष्ठत्व स्थापन करण्यासाठी बाकी सगळे जग नष्ट कां व्हावे? युद्धाची साधने फार खर्चिक व फार जालीम आहेत आणि कोणत्याहि एका साम्राज्याजवळ बाकीचे सारे जग जिंकण्याची शक्ति नाही. या विश्वाच्या निर्मात्याने मानवजातीला एकरूप बन-विलेले नाही. त्याने निरनिराळ्या वंशांचीं राष्ट्रे बनविली आहेत. पण राष्ट्रीय ध्येयाना एका उच्चतम समन्वयांत व आंतरराष्ट्रीय उपक्रमात विसर्जित करण्याचा एक अधिक सोपा व समंजस उपाय आहे. प्रत्येक देशाला या कार्यात आपला वाटा टाकावा लागेल. मानवजात सुसंघटित स्वयंपूर्ण राष्ट्रांची बनली पाहिजे.

दा. क्र. १०८९८

आंतरराष्ट्रीय शासनव्यवस्था न्यायावर उभारलेली हवी. आशियाने जर युरोपचें उदाहरण यशस्वी रीत्या गिरविले आणि आर्थिक शोषणाला व राजकीय आक्रमणाला विरोध केला तर युरोपला धोका पोचेल असे मानणे, हे विचित्र तर्कट आहे. आमचे राष्ट्रप्रेम तेवढे देवाची इच्छा, आणि दुसऱ्याचे राष्ट्रप्रेम म्हणे सैतानाची इच्छा ! एखाद्या देशाने शोषणाचे प्रचलित प्रकार अमान्य केले तर आम्ही त्या देशाला धोकेबाज मानतो. जगाची सुरक्षितता काही राष्ट्रांना गुलाम बनवण्यात नाही, तर सर्व राष्ट्रांच्या स्वातंत्र्यावर अवलंबून आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्य ही आंतर-राष्ट्रीय सहकार्याची एक अनिवार्य आवश्यकता होय. प्रत्येक मानवसमाजाचे व्यक्तित्व आदरले पाहिजे आणि प्रत्येक राष्ट्राला स्वतंत्र करणे हा जगाचा प्रयत्न आणि ध्येय असायला पाहिजे. जगाचे काही भाग इतरांपेक्षा मागासलेले असतील. त्यांचा दुबळेपणा ही इतरांनी आपल्या फायद्याची संधि समजू नये. आपल्या शेजाऱ्याच्या अगतिकतेचा गैरफायदा घेणारा माणूस जसा प्रामाणिक माणसांच्या दृष्टीने अपराधी ठरतो तसेच आपल्यापेक्षा दुबळ्या राष्ट्रावर कुरघोडी करणारे राष्ट्रहि गुन्हेगार ठरते. व्यक्तीप्रमाणे राष्ट्रांनाहि सहानुभूतीची गरज भासते. युगानुयुगांच्या पूर्वग्रहापासून स्वतःला मुक्त करण्यासाठी धडपडणाऱ्या समाजाकडे पाहण्याची राजकीय दृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांची दृष्टि सहानुभूतीची आणि सेवेची असायला हवी; त्यांच्यावर मेहेरबानी दाखविण्याची किंवा त्याना आपल्या मुठीत ठेवण्याची प्रवृत्ति असू नये. पूर्वेची जागृति पश्चिमेला संकटप्राय वाटू नये. चीनमध्ये क्रांति चालू आहे. भारताचे स्वातंत्र्य आता थोड्याच अवधीचा विषय आहे. तुर्कस्थान, इराण आणि अफगाणिस्थान फार झपाट्याने आधुनिक बनत आहेत, आणि हे सर्व जगाच्या भल्यासाठीच होत आहे. कोणतेहि राष्ट्र दुसऱ्याशिवाय जगू शकत नाही. राष्ट्रांचे परस्परावलंबन वेगाने वाढत आहे. म्हणून जिथे जिथे जुलुम व अन्याय असेल तिथे तिथे त्याविरुद्ध लढा देण्यास आपण मानवजातीच्या भवितव्यावर श्रद्धा ठेवून सरसावले पाहिजे.

केवळ उत्तम आदर्श पुरेसे नाहीत. त्यांची साधनेंहि व्यवहार्य हवीत. राष्ट्रसंघ ( लीग ऑफ नेशन्स ) आणि केलॉग-करार हे जनमत शिक्षित करायची उत्तम साधनें आहेत. तथापि, राष्ट्रसंघ हा राष्ट्रांची सद्यःस्थिति आहे तशीच कायम राखण्यासाठी मित्रराष्ट्रांनी उभे केलेले एक साधन मात्र आहे, असा एक संशय खोल रुजलेला व दूरवर पसरलेला आहे. सर्व राष्ट्रांच्या स्वातंत्र्याला व सुरक्षिततेला अधिक वाव देण्यासाठी ही संस्था बद्धपरिकर आहे, असे फारसे कोणाला वाटत नाही. आत्मसंरक्षणासाठी युद्ध सुरू करण्यासारखी परिस्थिति आहे किंवा नाही हे प्रत्येक राष्ट्र स्वतःच ठरवू शकते, अशी मुभा केलॉग–कराराच्या निर्मात्यानी दिल्यामुळे त्या कराराची किंमत बरीच कमी झाली आहे. राज्यनीति

म्हणून युद्ध वर्ज्य करायचे असेल तर काहीहि आडपडदा न ठेवता स्पष्टपणे तसे केले पाहिजे. जगात न्याय्य युद्ध असूच शकत नाही. राज्यनीति म्हणून युद्धाचा त्याग आपण करायला हवा. आत्मरक्षणासाठी म्हणूनसुद्धा युद्ध समर्थनीय नाही. संरक्षणाच्या तयारीत संभाव्य संकटांचाहि समावेश करता येईल व मग आक्रमणाचेहि समर्थन करता येईल. ज्या देशात सर्वच अंधुक आणि धुकाळ असेल तेथे प्रकाश व अंधार वेगवेगळे दाखवता येणार नाहीत. शिवाय हिंसेमागून प्रतिहिंसा येणारच, आणि मग सत्याला वावच मिळणार नाही. जोपर्यंत वेगवेगळे देश आपापल्या कक्षेतच फिरत आहेत तोपर्यंत संघर्ष अपरिहार्य आहेत. आपला व्यापार सतत वाढविण्यासाठी नवनवीन बाजारपेठांच्या शोधात निघालेली राष्ट्रे जगाच्या पाठीवरील प्रत्येक चौरस्त्यावर एकमेकाशी चढाओढ लावायला भेटणारच. पण हे संघर्ष विवेकाने सोडवावे, बळजबरीने नव्हे. सर्वांना लागू होणारा एकच कायदाकानू आपण ठरवला पाहिजे, सर्व जगाला मान्य होतील असे न्यायनिवाडे देणारे एकच श्रेष्ठ न्यायालय स्थापन केले पाहिजे. आणि त्याचे निवाडे अमलात आणणारे एकच पोलिस-दल उभारले पाहिजे. जोवर मोठी राष्ट्रे आपल्या सत्तेत तिळमात्रहि बदल करायला किंवा आपल्या सार्वभौमत्वाखालचा कोणताहि प्रदेश सोडायला तयार नाहीत, आणि प्रसंग पडल्यास आपली सत्ता टिकवण्यासाठी बलप्रयोग करण्याचीहि त्यांची तयारी आहे, तोपर्यंत राष्ट्रसंघ आणि केलॉग–करार हास्यास्पद विषय राहतील.

धार्मिक आदर्शवाद हेच जागतिक शांततेसाठी सर्वात आशादायक असे एक राजकीय अस्त्र जगाला आजवर आढळले आहे. जोवर आपण कर्तव्य आणि अधिकारांच्या दृष्टीने विचार करू तोवर माणसांच्या हितसंबंधांचा आणि आकांक्षांचा संघर्ष आपण मिटवू शकणार नाही. करार आणि राजनैतिक तडजोडींनी भावनावेग आवरता येईल पण भीति घालवता येणार नाही. जग मानवजातीच्या प्रेमाने ओथंबले पाहिजे. आपल्याला असे धर्मवीर हवेत की जे सर्व जग सुधारण्याची वाट पहात न बसता प्रसंगी आत्मबलिदान करून, 'जग हे एकच कुटुंब आहे' ह्या आपल्या निष्ठेचे सत्य जगाला पटवून देतील, आणि थोर स्टॅबथोल्डरचे ध्येयवाक्य तेहि स्वीकारतील: "कर्तव्य करण्यासाठी मला आशेची किंवा प्रयत्न करण्यासाठी यशाची आवश्यकता नाही."

ग्रंथ संग्रहालय
क्र. १०८२८

REFBK-0010894
REFBK-0010894

डॉ. राधाकृष्णन् यांचा लहानसा, पण मौलिक म्हणून मान्यता पावलेला हा ग्रंथ आहे. सुमारे २५ वर्षांपूर्वी इंग्लंड-मध्यें केगन् पॉल, ट्रेंचट्रूबनर या प्रकाशन संस्थेनें या ग्रंथाचें 'टुडे अँड टुमॉरो' या मालेंत प्रकाशन केलें. नंतर १९४८ मध्यें मुंबईच्या हिंद किताबतर्फे तो प्रसिद्ध झाला. मानवाच्या भाव-जीवनांत विविध प्रेरणांचा आज संघर्ष चालू आहे. माणसाच्या सुप्त व जागृत आकांक्षांतील घातक द्वंद्व आधुनिक मानस-शास्त्रज्ञांना दिसूं लागलें आहे. आज विज्ञानाची घोडदौड चालू आहे. तांत्रिक शोधांचे विजय डोळे दिपवीत आहेत. तरीहि आजची नवी संस्कृति अपूर्ण आहे. माणसाच्या भावनिक विश्वांत सुसंवाद निर्माण करण्यासाठीं शेवटीं व्यक्तिनिष्ठ अध्यात्माचीच कांस धरावी लागणार आहे. डॉ. राधाकृष्णन् यांनीं हाच विषय या पुस्तकांत थोडक्यांत, पण उद्‌बोधक रीतीनें चर्चिला आहे. अंतरात्म्याच्या मार्गदर्शनानें जे वाटचाल करतात त्यांना डॉ. राधाकृष्णन् यांनीं या पुस्तकांत दिलेला आशेचा संदेश साहाय्यभूत ठरेल.